१०४ शतकोत्तर वाटचाल

# नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

NAVAKAL

• मुंबई, मंगळवार २८ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-५४, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 54 Marathi - Daily - Mumbai, 28 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

मुलांसाठी 'टिन कॅन' फोनचा नवा ट्रेंड!

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## अमेरिकेत नव्या फोनची क्रेझ स्मार्टफोन ऐवजी टीन कॅन



**अमेरिकेत स्मार्टफोनच्या वाढत्या वापरामुळे मुलांवर होणाऱ्या परिणामांबाबत चिंता व्यक्त होत असताना टिन कॅन नावाचे लँडलाईनसारखे उपकरण वेगाने लोकप्रिय होत आहे. टिन कॅन टेक्नॉलॉजीज या कंपनीने विकसित केलेले हे उपकरण मुलांना स्क्रीनपासून दूर ठेवण्यासाठी पर्याय आहे.**

■ वॉशिंग्टन

**टिन** कॅन हे वायरलेस नेटवर्किंग तंत्रज्ञानावर आधारित असून, दिसायला जुन्या लँडलाईन फोनसारखे आहे. या उपकरणाद्वारे मुलांना एकमेकांशी मोफत कॉल करता येतात. आपत्कालीन सेवांशी संपर्क साधता येतो. पालकांच्या परवानगीने इतर क्रमांकावर कॉल करण्यासाठी दरमहा १० डॉलरचे शुल्क आकारले जाते.

एप्रिल २०२५ मध्ये बाजारात आल्यानंतर या उपकरणाची विक्री झपाट्याने वाढली आहे. मर्यादित प्रसिद्धी असूनही टिन कॅनची लोकप्रियता मुख्यतः तोंडी प्रचारामुळे वाढल्याचे कंपनीने सांगितले आहे. अनेक शाळांनीही या उपकरणाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. कॅन्सस सिटीजवळील नेटिव्हिटी

» पान ७ वर

# रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी सक्तीला अखेर मुदतवाढ

## नवी तारीख जाहीर करणार की सक्ती गुंडाळली?

**महाराष्ट्र सरकारने राज्यातील रिक्षा-टॅक्सीचालकांना १ मेपासून मराठी भाषा सक्ती जाहीर करीत लायसन्स रद्द करण्याचा इशारा दिला. या नियमाला कडाडून विरोध करणाऱ्या रिक्षा-टॅक्सी संघटनांशी बैठक घेतल्यानंतर आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या सक्तीला मुदतवाढ दिली जाणार असल्याचे सांगितले. उद्या हा निर्णय जाहीर होणार आहे. मात्र मुदतवाढ देताना अंमलबजावणीची पुढील तारीख जाहीर केली जाईल की, आता राजकीय दबावापोटी ही सक्ती कायमची गुंडाळली जाईल याकडे लक्ष लागून राहिले आहे.**



■ मुंबई

**रिक्षा-टॅक्सी** चालक हे प्रामुख्याने उत्तर भारतीय आहेत. त्यांना त्रास दिला तर त्याचा परिणाम उत्तर प्रदेश, बिहार या राज्यांत दिसू लागतो. पुढील वर्षी उत्तर प्रदेश विधानसभा निवडणूक आहे. त्यावरही या सक्तीचा परिणाम होईल हे लक्षात घेऊन भाजपा मुदतवाढ देण्याबाबत दबाव आणत असल्याचे बोलले जात होते. याच दबावापोटी सरनाईक यांनी माघार घेतली असे म्हटले जाते. त्याचवेळी सरनाईक यांनी ओला, उबर, रॅपिडो चालकांवर ही सक्ती केली नाही. त्यांच्याच फायद्यासाठी रिक्षा-टॅक्सीवर सक्तीचे पाऊल उचलले, पण विरोधामुळे आता माघार घेण्याची वेळ आली अशीही चर्चा आहे.

मंत्रालयातील आजच्या बैठकीत बहुतांश संघटनांनी मराठी सक्तीला विरोध नाही, परंतु अंमलबजावणीला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी केली. संजय निरूपम, शशांक राव, हाजी अराफत यांनी या बैठकीत मुदतवाढ मागितली. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे छगन भुजबळ यांनीही बळजबरी करू नये, त्यांना मराठी शिकवण्याची व्यवस्था करावी, अशी भूमिका मांडली. आजच्या बैठकीबाबत माहिती देताना सरनाईक म्हणाले की, सर्व संघटनांच्या प्रतिनिधींनी सरकारच्या मराठी सक्तीच्या भूमिकेला पाठिंबा दिला. मराठी न येणाऱ्यांना मराठी शिकवण्याची तयारीही दर्शवली. मात्र मराठी सक्तीची अंमलबजावणी १ मेपासून न करता मुदतवाढ द्यावी, अशी मागणी संघटनांनी केली. परिवहन मंत्री या नात्याने मीदेखील मुदतवाढीबाबत सकारात्मक आहे. कारण रोजगारनिर्मिती करावी, रोजगाराला चालना द्यावी हे आमच्या सरकारचे धोरण आहे. मी त्यांना सांगितले की, महाराष्ट्र हे देशातील एक प्रगत राज्य आहे. रोजगार निर्मिती हे आमचे पहिले उद्दिष्ट आहे. या बाबतीत महाराष्ट्र देशातील पहिले राज्य व्हावे असा आमचा मानस आहे. त्यामुळे या कारणांमुळे कुणाचाही रोजगार बुडणार नाही याची दक्षता घेतली जाईल. परंतु कुणी मराठी ऐवजी हिंदीचा आग्रह धरला तर ते चालणार नाही. महाराष्ट्रात तुम्हाला व्यवसाय करायचा असेल, रिक्षा-टॅक्सी चालवायची असेल, तर तुम्हाला मराठी येणे अनिवार्य आहे, बंधनकारक आहे. रिक्षा व टॅक्सी चालकांना जुजबी मराठी आलीच पाहिजे. सरकारच्या या भूमिकेशी सर्वांनी सहमती दर्शवली. त्यांनी या गोष्टीची पूर्तता करण्यासाठी आपल्या संघटनांच्या कार्यालयात मराठीची शिकवणी घेण्याची तयारी दर्शवली आहे. आपल्या रोजीरोटीवर कुठेही गदा येता कामा नये, अशी सरकारची भूमिका असेल तर आम्हाला मान्य आहे असे त्यांचे म्हणणे होते. मात्र विविध संघटनांनी वेगवेगळ्या कालावधीची मुदतवाढ मागितली. कोणी तीन महिन्यांची, कोणी सहा महिन्यांची तर कोणी एका वर्षाची मुदतवाढ मागितली. त्यामुळे आजच्या बैठकीत मी या संघटनांना मुदतवाढीबद्दल कोणताही ठोस शब्द दिला नाही. उद्या राज्यातील ५९ आरटीओंची मी बैठक बोलावली आहे. त्या बैठकीनंतर मुदतवाढीबाबत निर्णय मी जाहीर करीन. मात्र या प्रकरणी रिक्षा-टॅक्सी चालकांचे समाधान करण्यासाठी मुदतवाढ देण्याचा आमचा हेतू अजिबात नाही.

» पान ७ वर

## तीन दिवसांत युद्धबंदी मान्य करा अन्यथा तेल पाईपलाईन फुटतील

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल इराणला उद्देशून अप्रत्यक्षपणे इशारा दिला. इराणकडे आता मोजकेच दिवस राहिले आहेत. तीन दिवसांत त्यांनी युध्दबंदीच्या अटी मान्य केल्या नाहीत तर त्यांच्या तेल पाईपलाईनमध्ये स्फोट होईल. त्यामुळे इराणचा तेल व्यापार पूर्णपणे ठप्प होईल, असे ट्रम्प म्हणाले.

यामागील तर्क सांगताना ट्रम्प म्हणाले की, इराण तेलाची निर्यात जास्त काळ करू शकला नाही तर पाईपलाईनमध्ये तेलाचा दाब वाढेल. इराण सध्या तेल जहाजांपर्यंत किंवा साठवण टाक्यांपर्यंत वाहून

**ट्रम्प यांचा इराणला अप्रत्यक्ष इशारा**



नेऊ शकत नाही. कारण त्यावर आम्ही नाकेबंदी लावली आहे. जेव्हा तेलाचा प्रवाह असा अडवून ठेवावा लागतो तेव्हा पाईपलाईनच्या आत दाब निर्माण होऊन तांत्रिक कारणाने पाईपलाईन फुटू शकते. तसे झाल्यास पाईपलाईन पूर्वस्थितीला आणणे इराणला जवळपास अशक्य होईल.

दुसरीकडे ट्रम्प यांनी कितीही दबाव टाकला तरी त्यासमोर झुकण्यास इराण आजही तयार नाही. इराणने अमेरिकेसोबत करारासाठी कठोर भूमिका घेतली आहे. आमचा अणु कार्यक्रम आणि होर्मुजवरील आमचे नियंत्रण या मुद्यांवर कोणतीही तडजोड करून करार केला जाणार नाही, असे ठाम मत इराणने मांडले आहे. अशा परिस्थितीत युद्धबंदीचा करार होण्याची शक्यता धूसर आहे.

## 'दादी हाऊस'च्या लिलावावर पारसी पंचायत सदस्य नाराज

■ मुंबई

**बॉम्बे** पारसी पंचायतने (बीपीपी) बोरा बाजार येथील चार मजली दादी हाऊस या इमारतीचा लिलाव करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी दादी हाऊसची किमान किंमत २.५ कोटी रुपये ठेवण्यात आली आहे. या निर्णयाला बीपीपीच्या काही सदस्यांनी विरोध केला आहे. बहुतांश सदस्यांचा या इमारतीच्या किमान किमतीवर आक्षेप आहे. ही किंमत फारच कमी असून, ठोस स्पष्टीकरण न देता ही इमारत कवडीमोलाने विकण्यात येत आहे, असे विरोध करणाऱ्या सदस्यांचे म्हणणे आहे.

दादी हाऊस लिलावात काढून बीपीपीने ज्या सदस्यांनी ही इमारत दान केली त्यांचा विश्वासघात केला आहे, अशी भूमिका विरोधकांनी घेतली आहे. बीपीपीचे एक सदस्य डॉ. खुषरू झाईवाला यांनी ही इमारत लिलावात विकण्याच्या निर्णयाला कडाडून विरोध केला आहे. कालच त्यांनी बीपीपीचे अध्यक्ष आणि विश्वस्तांना एक पत्र लिहून निर्णयावर जोरदार टीका केली आहे. दुसरीकडे बीपीपीचे अध्यक्ष विराफ मेहता निर्णयावर ठाम आहेत.

## सुनावणीत सहभागी होणार नाही! केजरीवालांचा न्या. शर्माविरोधात सत्याग्रह

■ नवी दिल्ली

**दिल्लीचे** माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे (आप) प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी न्यायमूर्ती स्वराणा कांता शर्मा यांच्यासमोर दिल्ली उच्च न्यायालयात सुरू असलेल्या दिल्ली मद्य धोरण प्रकरणाच्या सुनावणीत, ते आणि त्यांचे वकील सहभागी होणार नाहीत किंवा युक्तिवादही करणार नाहीत, असा निर्णय घेतला आहे. यासाठी गांधीजींसारखा सत्याग्रह करणार आहोत, असेही त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणात केजरीवाल आणि इतर सर्व आरोपींना कनिष्ठ न्यायालयाने दोषमुक्त केले आहे. या निर्णयाविरोधात



सीबीआयने दाखल केलेल्या अपिलावर न्या. शर्मा यांच्यासमोर सुनावणी सुरू आहे. न्या. शर्मा यांनी या प्रकरणातून स्वतःला दूर ठेवण्याची केजरीवाल यांनी विनंती केली होती. केजरीवाल यांनी न्या. कांता यांच्या न्यायालयात आणखी एक प्रतिज्ञापत्र दाखल करत या न्यायमूर्तींची दोन मुले सॉलिसीटर जनरल तुषार मेहता यांच्यासोबत काम करत असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. तुषार मेहता हे सीबीआयचे प्रतिनिधित्व करतात. या परिस्थितीत न्या. शर्मा तुषार मेहता यांच्या विरोधात आदेश कसा जारी करू शकतील? असा सवाल केजरीवाल यांनी उपस्थित केला आहे. याशिवाय न्या. शर्मा यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संलग्न

» पान ७ वर

## टीसीएस गैरकारभाराची तक्रार सहा महिन्यांपूर्वी दिली होती

■ पुणे

**टाटा** कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमध्ये (टीसीएस) महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ आणि बळजबरी धर्मांतर प्रकरणात आता एक वेगळी बाजू

**कर्मचारी संघटनेचा दावा**

समोर आली आहे. टीसीएसमध्ये असे गैरप्रकार होत असल्याची तक्रार उघडकीस येण्याच्या सहा महिने आधीच कामगार मंत्र्यांकडे केली होती. मात्र मंत्र्यांनी कोणतीही कारवाई केली नाही, असा आरोप पुण्यातील आयटी कर्मचाऱ्यांच्या संघटनेने केला आहे.

फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज (एफआयटीई) या संघटनेने हा आरोप केला आहे. कामगार मंत्रालयाने जर वेळीच दखल घेऊन आवश्यक पावले उचलली असती तर हे प्रकरण एवढ्या टोकाला जाण्याआधीच रोखता आले असते, असा दावा संघटनेने केला आहे. एफआयटीईच्या म्हणण्यानुसार, गेल्या वर्षभरात नाशिक टीसीएसमधील कर्मचाऱ्यांवर विविध प्रकारे अन्याय होत होता. कर्मचाऱ्यांना बेकायदेशीरपणे कामावरून काढून टाकले जात होते. मातृत्व रजेवर असलेल्या काही महिला कर्मचाऱ्यांना थेट सेवेतून कमी केले गेले. काहींना बळजबरी राजीनामा देण्यास भाग पाडले गेले.

## राज्यात ८५ हजार कृषी सेवा केंद्रांचा बेमुदत संप! शेतकरी अडचणीत

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** सुमारे ८५ हजार कृषी सेवा केंद्र चालकांनी आजपासून बेमुदत बंद आंदोलन सुरू केले. खते, बियाणे आणि कीटकनाशक विक्रेत्यांच्या विविध मागण्यांसाठी हे आंदोलन आहे. केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरोधात यावेळी तीव्र नाराजी व्यक्त केली. कृषी केंद्र चालकांच्या एमएएफडीए संघटनेतर्फे या आंदोलनाची घोषणा केली. मात्र यामुळे शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता आहे.

संघटनेचे राज्याध्यक्ष विनोद तराळ पाटील यांनी माहिती दिली की, महाराष्ट्रासह



देशातील काही राज्यांतील कृषी सेवा केंद्र चालकांनीही या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला. सरकारने मागण्या मान्य केल्या नाहीत तर पॉस मशीन शासनाकडे जमा करण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे. हिंगोली जिल्ह्यातील सुमारे ७०० कृषी केंद्र चालकांनी या आंदोलनात सहभाग घेतला. खत कंपन्यांकडून केली जाणारी 'लिंकिंग' पद्धत, अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाण्यांची विक्री, अवैध कीटकनाशके आणि खते एजंटमार्फत थेट शेतकऱ्यांना विक्री, बियाणे विक्रीसाठी 'साथी' पोर्टलची सक्ती, बियाणे बोगस निघाले

» पान ७ वर

## डान्स कार्यक्रमात धक्कादायक घटना रोबोटने तरुणीला थेट मिठीच मारली

**रोबोट अर्थात यंत्रमानव, त्याची अधिक पुढारलेली पिढी म्हणजे ह्युमनॉईड. हे ह्युमनॉईड हुबेहुब माणसांसारख्या हालचाली, हावभाव करतात. मात्र त्यांच्यामध्ये माणसांसारखे गुण-दोषही निर्माण होऊ शकतात का, असा प्रश्न चीनमध्ये नुकत्याच घडलेल्या एका घटनेमुळे जगभरात चर्चिला जात आहे. चीनमध्ये एका नृत्याच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या एका ह्युमनॉईड रोबोटने नाचता नाचता एका देखण्या तरुणीला थेट मिठीच मारली. रोबोटने हे कृत्य स्वयंप्रेरणेने केले की, कोणीतरी त्याच्याकडून करवून घेतले, यावर आता काथ्याकूट सुरू झाला आहे.**

■ बीजिंग

**चीनच्या** शांक्सी प्रांतातील चाँगकिंग नॉर्मल युनिव्हर्सिटीमध्ये हा नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात रंगत आणण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित ह्युमनॉईड रोबोटला सहभागी करण्यात आले होते. माणसांप्रमाणे संगिताच्या ठेक्यावर नृत्य करणाऱ्या या रोबोटला पाहून सारेच अवाक् झाले. मात्र त्यानंतर या रोबोटने उत्साहाच्या भरात भलतेच कृत्य केले. आपल्या शेजारी नृत्य करत असलेल्या तरुणीला रोबोटने घट्ट मिठी मारली. हा प्रकार पाहून सारेच क्षणभर गडबडून गेले. आयोजकांनी प्रसंगावधान दाखवत रोबोटला त्या तरुणीपासून दूर खेचले.

हे असे कशामुळे घडले याचे उत्तर आयोजकांनी दिले. ते म्हणजे रोबोटच्या संचलनात झालेली तांत्रिक गडबड. जेव्हा हा कार्यक्रम सुरू होता तेव्हा त्या परिसरात अनेक ड्रोन उडत होते. त्या ड्रोनमधून निघणाऱ्या ईलेक्ट्रॉनिक सिग्नल्समुळे ह्युमनॉईड रोबोटच्या संचलनात गडबड झाली आणि त्यामुळे रोबोटकडून हे कृत्य घडले, असे आयोजकांकडून सांगण्यात आले.

या घटनेबद्दल स्पष्टीकरण देताना चाँगकिंग विद्यापीठाचे उपसंचालक गाओ ह्युआन म्हणाले की, संचलनातील चुकीमुळेच हा प्रकार घडला असावा. कारण रोबोट म्हणा किंवा ह्युमनॉईड



रोबोट हे त्यांना दिलेल्या प्रोग्रॅमनुसार हालचाली करतात. जर कार्यक्रमात सहभागी झालेल्या नर्तकांनी नृत्याच्या आधी ठरलेल्या पॅटर्नमध्ये बदल केल्यास ह्युमनॉईडकडून अशा चुका होऊ शकतात. त्यामुळे या घटनेकडे ह्युमनॉईडने स्वयंप्रेरणेने केलेली कृती, अशा दृष्टीने पाहिले जाऊ नये.

## राज्यावर पाणीटंचाईचे सावट

### धरणांत केवळ ४३ टक्के साठा

■ मुंबई

**राज्यात** उन्हाचा तडाखा वाढत असताना धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे महाराष्ट्रावर पाणीटंचाईचे संकट गडद होत आहे. जलसंपदा विभागाच्या २५ एप्रिलच्या आकडेवारीनुसार, राज्यातील ३०२८ धरणांमध्ये सध्या केवळ ४३.२३ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत हा साठा यावर्षीच्या तुलनेत सुमारे ७ टक्क्यांनी अधिक होता.



मे महिन्यातील कडक उन्हाळा आणि वाढते तापमान लक्षात घेता प्रशासनासमोर पाण्याचे नियोजन करण्याचे आव्हान आहे. विशेषतः पुणे विभागातील स्थिती अधिक गंभीर झाली आहे. या विभागात सध्या केवळ ३६.३० टक्के पाणीसाठा उपलब्ध असून, पुढील काही आठवड्यांत

» पान ७ वर

## अजित पवार अपघात! रोहित पवार २८ एप्रिलला सीआयडीची भेट घेणार

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एक्स पोस्टद्वारे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी तपासाची गती मंद असल्याचा आरोप केला. त्यांनी २८ एप्रिलला सीआयडी कार्यालयात भेट देऊन अपघाताच्या तपासाचा आढावा घेणार असल्याचे स्पष्ट केले.

रोहित पवार यांनी एक्सवर लिहिले की, अजितदादांच्या अपघाताला परवा तीन महिने होत आहेत. मात्र अद्यापही तपास पुढे सरकलेला नाही. सीआयडी नेमके काय करते आहे हे देखील कळायला मार्ग नाही. त्यामुळे २५ तारखेला सकाळी १० वाजता पुण्यातील सीआयडी कार्यालयाला भेट देऊन तपासाची सद्यस्थिती जाणून घेणार आहे. तसेच माझ्याकडे आलेली नवीन माहिती आणि कागदपत्रे सीआयडीकडे सादर करणार आहे. अजितदादांच्या अपघाताचा तपास सीबीआयकडे देण्याच्या मागणीला २ महिन्यांहून अधिकचा कालावधी झाला तर केंद्रीय गृहमंत्र्यांना भेटून सीबीआय तपासाचा प्रश्न मार्गी लावण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनाला एक महिना लोटला असून, काहीही कार्यवाही न झाल्याने सर्वसामान्य जनतेत याविषयी प्रचंड नाराजी आहे.

> **देशात विरोधी पक्षाची सत्ता असलेल्या राज्यात ऑपरेशन लोटस मोहीम राबविणे हा भारतीय जनता पक्षाचा छंद आहे. भाजपाची सत्ता असलेल्या राज्यातही ऑपरेशन लोटस राबवून विरोधी पक्ष खिळखिळा करणे हा सुध्दा या पक्षाचा अजेंडा आहे. त्यामुळे विरोधी पक्षांची तोडफोड करणे, विरोधी पक्ष कमकुवत करणे आणि प्रादेशिक पक्षांच्या नेत्यांना केंद्रीय तपास यंत्रणांच्या नोटीसा पाठवून बेजार करणे ही मालिका गेली बारा वर्षे या देशात चालू आहे. महाराष्ट्रात शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना याच ऑपरेशन लोटसने दुर्बळ केली. आता याच ऑपरेशन लोटसने अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला टार्गेट बनवले आहे. आपचे राज्यसभेतील सात खासदारांनी थेट भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे केजरीवाल यांच्या नेतृत्वावर आणि पंजाबमधील भगवंत मान यांच्या नेतृत्वाखालील आप सरकारवरच ऑपरेशन लोटसने घाव घातला आहे. केवळ संसदेतील 'आप'ची तोडफोड एवढेच या मोहिमेचे उद्दिष्ट नाही तर पंजाबमधील आप सरकार हे मुख्य टार्गेट आहे.**

# आपमधील गद्दार




**डॉ. सुकृत खांडेकर**

अण्णा हजारे यांनी दिल्लीत जंतरमंतर वर केलेल्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनातून अरविंद केजरीवाल यांनी प्रेरणा घेऊन आम आदमी पक्षाची स्थापना केली. लोकपाल आंदोलनात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी राजकारणात पडू नये असा अण्णांचा सल्ला होता. पण केजरीवाल यांनी तो मानला नाही. दिल्लीकरांचे मोठे जनसमर्थन मिळाल्याने त्यांनी आम आदमी पक्षाची स्थापना केली व दिल्लीत आपल्या पक्षाचे सरकार स्थापन करून दाखवले. पारदर्शक कारभार, प्रामाणिकपणा व भ्रष्टाचारमुक्त प्रशासन या त्रिसुत्रीचा त्यांनी मोठा गवगवा केला. यातून पक्षाचा विस्तार झाला. दिल्लीत त्यांनी काँग्रेस व भाजपाला पर्याय दिला. पण मद्य घोटाळ्यातील एकेक सुरस कथा बाहेर येताच, जनतेचा त्यांच्यावरील विश्वास कमी झाला. पंजाबमध्ये आपची सत्ता आहे, पण जेलमध्ये जाऊन आल्यानंतर केजरीवाल यांना दिल्लीची सत्ता गमवावी लागली. ज्यांनी पक्षाच्या स्थापनेपासून म्हणजेच पंधरा वर्षांपासून केजरीवाल यांना साथ दिली तेच खासदार त्यांना सोडचिठ्ठी देऊन भाजपामध्ये गेल्यामुळे केजरीवाल यांच्या नेतृत्वाला तडा गेला आहे व पंजाबमधील मान सरकारवर अस्थिरतेची तलवार लटकली आहे. राघव चढ्ढा यांच्या नेतृत्वाखाली सात खासदारांनी बंडाचा झेंडा फडकवला ते केजरीवाल यांना दोष देत आहेत. केजरीवाल यांच्या गुन्ह्यांमधे आणि त्यांनी केलेल्या पापांमधे आम्ही सहभागी होऊ शकत नाही, असा ते आव आणत आहेत. महाराष्ट्रात १९९१ मध्ये छगन भुजबळ बारा आमदारांसह शिवसेनेतून बाहेर पडले व काँग्रेसमध्ये सामील झाले तेव्हा ठाकरेंनी व शिवसैनिकांनी त्यांची गद्दार अशी संभावना केली होती. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे तर भुजबळांना लखोबा असे संबोधत होते. २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ४० आमदारांनी बंड करून उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाला आव्हान दिले, तेव्हा ठाकरे व त्यांच्या नेत्यांनी बंडखोरांना सातत्याने गद्दार असे हिणवले. २०२३ मध्ये अजित पवार यांनी ४२ आमदारांसह शरद पवारांच्या विरोधात हाळी दिली तेव्हा त्यांना कोणी थेट गद्दार असे म्हटले नाही. एकनाथ शिंदे व अजित पवार हे आपल्या आमदारांसह भाजपामध्ये सामील झाले नाहीत हे त्यांचे वेगळेपण आहे. त्यांनी आपला गट हाच खरा मूळ पक्ष आहे असे निवडणूक आयोगाला पटवून दिले व निवडणूक आयोगानेही शिंदे यांच्या गटाला शिवसेना हे नाव व धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह दिले. तसेच अजित पवार यांच्या गटाला निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव व घड्याळ हे निवडणूक चिन्ह दिले. आप मधील बंडखोर खासदारांनी वेगळा पक्ष स्थापन केला नाही किंवा आमचा गट हाच मुळचा खरा पक्ष, असा दावाही केला नाही. ते सर्व सातही खासदार भाजपामध्ये सामील झाले. आता त्यांचे भविष्य हे नरेंद्र मोदी, अमित शहा व नितीन नबिन यांच्यावर अवलंबून आहे.

आप खासदारांच्या बंडखोरीनंतर हरभजन सिंग यांच्या पंजाबमधील घराच्या भिंतीवर गद्दार अशा घोषणा एका रात्रीत रंगवल्या गेल्या. बंडखोर खासदारांचा 'आप'चे गद्दार असा उल्लेख पक्षात केला जातो आहे.


राज्यसभेत आपचे दहा खासदार होते. पैकी सात खासदार भाजपामधे गेले. दोन तृतियांश खासदारांनी पक्षांतर केल्याने त्यांच्यावर कारवाई होण्याची शक्यता नाही. आता लोकसभेत तीन व राज्यसभेत तीन आपचे खासदार उरले आहेत. संसदेच्या दोन्ही सभागृहांत अध्यक्ष व सभापती हे भाजपाचे आहेत. पुढील वर्षी होणाऱ्या पंजाब विधानसभा निवडणुकीपूर्वी आपवर कोसळलेले हे मोठे राजकीय संकट आहे. अगोदरच दिल्ली विधानसभेची सत्ता 'आप'ला गमवावी लागली आणि आता पंजाबमधील आप सरकारला अस्थिरतेचा धोका निर्माण झाला आहे.

पक्षात असंतोष आहे, याची कल्पना केजरीवाल यांना होती. म्हणूनच त्यांनी पक्षाचे खासदार व पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्याचे ठरवले होते. ज्यांना पक्षाच्या कार्य प्रणालीविषयी शंका असेल त्यांनी त्यांच्या पदावरून आपणहून दूर व्हावे असे ते सांगणार होते. पण ती वेळ आलीच नाही. कारण बैठक होण्याअगोदरच राज्यसभेतील सात खासदारांनी भाजपाकडे धाव घेतली. 'आप'मधील खासदारांनी एकाच वेळी पक्ष सोडण्याचे ठरवले नव्हते. पण राघव चढ्ढा यांना उपनेतापदावरून पक्षाने हटवले व त्यांच्या जागी मोठे उद्योगपती अशोक मित्तल यांची नियुक्ती केली, तेव्हापासून धुसफूस वाढली. त्यातच मित्तल यांच्या दिल्ली, जालंधर व गुरूग्राम येथील घरांवर, उद्योग समूहांवर व शैक्षणिक समूहांवर ईडीच्या पाठोपाठ धाडी पडल्याने स्वत: मित्तलही भाजपामध्ये जाण्यास राजी झाले. जेल किंवा भाजपा, या पर्यायात मित्तल यांनी भाजपा प्रवेश निवडला. भाजपाच्या मुख्यालयात राघव चढ्ढा, अशोक मित्तल, संदीप पाठक यांचे मिठाई भरवून स्वागत करण्यात आले. आपच्या विस्तारात व निवडणूक रणनिती बनविण्यात या तीनही नेत्यांचे मोठे योगदान असायचे. हरभजन सिंग, स्वाती मालिवाल, विक्रम सहानी, राजिंदर गुप्ता या खासदारांनीही मोदीजींच्या नेतृत्वाखाली २०४७ मध्ये विकसित भारत उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भाजपामध्ये काम करण्याचे ठरवले आहे.

ऑपरेशन लोटसमधून भाजपाला पंजाब सरकार अस्थिर करायचे आहे असा आरोप 'आप'चे खासदार संजय सिंह यांनी केला आहे. स्वाती मालिवाल या दिल्लीतून राज्यसभेवर खासदार म्हणून निवडून गेल्या आहेत. मात्र अन्य सहा जण हे पंजाबमधून राज्यसभेवर गेले आहेत. गेली बारा वर्षे राघव चढ्ढा हे भाजपावर तिखट शब्दात टीका करीत असायचे. आता ते मोदींची प्रशंसा करीत आहेत. स्वत: केजरीवाल हे आपण मोदींना पर्याय ठरू शकतो अशी स्वप्ने बघत होते. इंडिया आघाडीमध्ये केजरीवाल हे विरोधी पक्षांत सर्वमान्य नेता होऊ शकतात, असे आपचे म्हणणे होते. पण सात खासदारांच्या बंडानंतर केजरीवाल यांच्या महत्त्वाकांक्षेवरही पाणी पडले आहे. एकाच वेळी सात दिग्गज नेते भाजपामध्ये निघून जातात, याचे खरे कारण काय? त्यांचा केजरीवाल यांच्यावर विश्वास का उडाला? केजरीवाल यांनाही त्यांच्या नेत्यांना सांभाळून ठेवता आले नाही. राघव चढ्ढा व संदीप पाठक हे केजरीवाल यांच्या निकटवर्तीय होते. सात खासदार हे कोणी फार मोठा जनाधार असलेले नेते नाहीत, पण ते बुद्धीवादी, रणनितीकार व जनमानसात आदराचे स्थान प्राप्त केलेले होते. केजरीवाल पुन्हा आम आदमी पक्षाला संजिवनी देऊ शकतील की, सात खासदारांचे बंड ही 'आप'च्या अस्ताची सुरुवात आहे? याचे काळच उत्तर देईल.

# निफाडमध्ये प्रखर उष्णतेमुळे कुक्कुटपालन उद्योग संकटात

■ नाशिक



**कोंबड्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत चालले**

जिल्ह्यातील निफाड तालुक्यात एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासूनच वाढलेल्या प्रचंड उष्णतेचा मोठा फटका पोल्ट्री म्हणजेच कुक्कुटपालन व्यवसायाला बसत आहे. असह्य उष्णतेमुळे कोंबड्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले असून, अंडी आणि मांस उत्पादनात घट झाल्याने पोल्ट्री व्यावसायिक मोठ्या संकटात सापडले आहेत.

असह्य उष्णतेमुळे कोंबड्यांना उष्माघात होऊन त्यांचा मृत्यू होत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कोंबड्यांच्या मृत्यूचे प्रमाण १० ते १२ टक्क्यांनी वाढले आहे.

उष्णतेमुळे कोंबड्या खाद्य कमी खातात, परिणामी त्यांचे वजन घटत आहे. त्यामुळे अंडी देणाऱ्या कोंबड्यांच्या उत्पादनातही मोठी घट झाली आहे. उष्णतेपासून बचाव करण्यासाठी फॉगर, स्प्रिंकलर, फॅन आणि शेडवर उसाची पाचट टाकणे यासारख्या उपायांवर व्यावसायिकांना अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. अनेक भागांत विजेचे भारनियमन आणि कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने पाण्याचे फवारे आणि पंखे बंद राहतात. त्यामुळे कोंबड्या मरण पावतात. पोल्ट्री व्यावसायिक उष्णतेपासून बचाव करण्यासाठी शेडवर उसाचे पाचट टाकून त्यावर स्प्रिंकलर चालवत आहेत. तसेच, शेडमध्ये कुलर लावणे, पत्र्यावर चुन्याचा लेप लावणे आणि कोंबड्यांना थंड पाणी देणे यासारखे उपाय केले जात आहेत. या संकटाचा सर्वाधिक फटका छोट्या पोल्ट्री व्यावसायिकांना बसत आहे.



# मालेगावमध्ये उष्णतेची लाट पारा ४३ अंशांवर स्थिरावला

■ मालेगाव

**कडक उन्हामुळे दुपारी रस्त्यांवर शुकशुकाट**

**उत्तर** महाराष्ट्रातील मालेगाव शहर सध्या भीषण उष्णतेच्या लाटेचा सामना करत आहे. एप्रिलच्या अखेरीस तापमानाचा पारा ४३ अंशांवर स्थिरावला असून, रविवारी तर पारा दुसऱ्यांदा ४३.४ अंशांवर पोहोचला होता. कडक उन्हामुळे दुपारी रस्ते ओस पडत असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. उष्णतेचा वाढता तडाखा पाहता नागरिकांनी दुपारी १२ ते ४ यावेळेत घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

मालेगाव शहरात ११ एप्रिलपासून हवामानात वेगाने बदल झाला असून, उष्णतेची लाट सुरू झाली. ११ एप्रिल रोजी कमाल तापमान पुन्हा ४१ अंशांवर गेले. त्यानंतर हा पारा सातत्याने वाढत गेला. १६ एप्रिल रोजी कमाल तापमानाची तब्बल ४३.४ अंश सेल्सिअस अशी यंदाच्या हंगामातील उच्चांकी नोंद झाली. त्यानंतर काही दिवस हलकासा दिलासा मिळाला. परंतु

आता पुन्हा तापमानात वाढ झाली आहे. शनिवार २५ एप्रिल रोजी कमाल तापमान ४३.४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. काल रविवारी त्यात किंचित घट झाली. काल तापमानाचा पारा ४३.२ वर होता. दिवसा कडक उन्हाबरोबर रात्रीही असह्य उकाडा जाणवत आहे. दुपारी रस्त्यांवर शुकशुकाट दिसत आहे. यंदा मार्च महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहातही मालेगावातील तापमानाने ४० अंशांची पातळी ओलांडली होती. मात्र मधल्या काळात झालेला अवकाळी पाऊस आणि गारपीट यामुळे पारा खाली आल्याने काहीसा दिलासा मिळाला होता. पण आता संपूर्ण एप्रिल महिना उष्णतेच्या लाटेचा बनला आहे.

# निदा खानला दिलासा नाही २ मे रोजी जामिनावर निकाल

■ नाशिक

**नाशिक** येथील गाजत असलेल्या टीसीएस प्रकरणात आरोपी निदा खान हिच्या अंतरिम अटकपूर्व जामीन अर्जावर आज सुनावणी पार पडली. नाशिक रोड न्यायालय यांनी या अर्जावरील निर्णय राखून ठेवत २ मे रोजी निकाल जाहीर करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे निदा खानवरील अटकेची टांगती तलवार अद्याप कायम आहे.

या प्रकरणात निदा खानने गरोदरपणाचे कारण पुढे करत अंतरिम अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. आज झालेल्या सुनावणीत दोन्ही बाजूंनी अंतिम युक्तिवाद पूर्ण केला. बचाव पक्षाच्या वकिलांनी न्यायालयात सांगितले की, विरोधी पक्षाने धर्मांतराच्या मुद्द्यावर भर दिला. मात्र महाराष्ट्रात सध्या धर्मांतरविरोधी कोणताही स्वतंत्र कायदा अस्तित्वात नसल्याने तो गुन्हा ठरत नाही.

वकिलांनी पुढे सांगितले की, दाखल एफआयआरमध्ये केवळ धार्मिक भावना दुखावल्याचा गुन्हा नमूद करण्यात आला आहे. त्यामुळे प्रकरणाचे स्वरूप वेगळ्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# सांगलीच्या शिराळा तालुक्यातील २२ पाझर तलाव कोरडे



■ शिराळा

**सांगली** जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात एप्रिलच्या अखेरीस पाणी टंचाईच्या झळा तीव्र झाल्या. शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला. तालुक्यातील ४९ पाझर तलावांपैकी २२ तलाव पूर्ण कोरडे पडले आहेत. तर उर्वरित तलावांतील पाणीसाठा ३० टक्क्यांपेक्षा कमी आहे.

रेठरे धरणातील उपयुक्त पाणी साठा संपल्याने स्थिती अधिकच चिंताजनक बनली आहे. सध्या या धरणात अवघे ९ टक्के पाणी शिल्लक आहे. शिवणी धरणात सुमारे २६ टक्के पाणी असले तरी, कालव्यापर्यंत पाणी पोहोचत नसल्याने शिराळा, खेड व शिवणी परिसरातील ऊस व भाजीपाला पिके वाळण्याच्या मार्गावर आहेत. मोरणा धरणातून ७ दिवस पाणी सोडून आठ दिवस बंद ठेवण्याची पद्धत सुरू आहे. या धरणावर ४९४ हेक्टर ऊस व ४३८ हेक्टर रब्बी क्षेत्र अवलंबून असून, शिराळा शहर, एमआयडीसी, उपवळे, पाडळी, बिऊर, तडवळे, अंत्री, भाटशिरगाव व मांगले गावांतील शेतीला या पाण्याचा लाभ होतो.

# आ. संजय गायकवाडांच्या धमकीनंतर 'शिवाजी कोण होता?'ची विक्रमी विक्री

■ कोल्हापूर

**दिवंगत** कॉ. गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावरून बुलडाण्याचे शिंदेसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना शिवीगाळ करत धमकी दिली होती. यावरून राज्यभरात वाद उसळला. अनेक पुरोगामी संघटनांनी गायकवाड यांच्या भूमिकेचा निषेध केला. मात्र या वादानंतर या पुस्तकांच्या प्रतींची विक्रमी विक्री झाली. या वादानंतर या पुस्तकाबाबत नागरिक, विद्यार्थी आणि वाचकांमध्ये उत्सुकता वाढली. राज्यभरातून मोठ्या प्रमाणात मागणीने उपलब्ध साठा संपला. ४ दिवसांत १० हजारांहून अधिक प्रती विकल्या गेल्या. वाढत्या मागणीमुळे नव्या आवृत्तीची छपाई तातडीने सुरू करण्यात आली आहे.

**मध्य रेल्वे**

**पुरवठा आणि स्थापना काम**

**ई-निविदा सूचना क्र. आरआर/पीआर/एसएनपीडी/३३५/२५-२६/३६.** सहाय्यक कामे व्यवस्थापक, म. रेल्वे, ईएमयू पीओएच, सानपाडा, नवी मुंबई. **कामाचे नाव:** डॅशपॉट विभागाच्या विकासाकरिता कामाचे टेबल्स, एम.एस. चेकर्ड फ्लोरिंग आणि लोअर रबर वॉशर स्क्रॅप यार्डचा पुरवठा आणि स्थापना. **कामाची अंदाजित किंमत:** ₹ ४७२०७०५. ३. **इसारा रक्कम:** ₹ ९४४००. **निविदा अर्जाची किंमत:** शुन्य. **पूर्तता कालावधी:** ३ महिने. **निविदा सादरीकरण बंद होण्याचा दिनांक आणि वेळ:** दि. १८.०५.२०२६ रोजी १४.३० वाजेपर्यंत. **बोली सुरु होण्याचा दिनांक:** दि. ०४.०५.२०२६. निविदा फक्त वेबसाईट www.ireps.gov.in द्वारे ई-निविदा स्वरुपात स्वीकारण्यात येतील. निविदा दस्तऐवज वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

रेल्वे क्रॉसिंग बंद असताना ते ओलांडण्यास मनाई आहे 93

# वंदे भारत एक्स्प्रेस रुळावरून घसरली

**पुणे-** पुणे स्टेशनजवळ वंदे भारत एक्स्प्रेस (सीएसएमटी-सोलापूर) रुळावरून घसरली. प्लॅटफॉर्मवर प्रवेश करताना ट्रेनचा चौथा डबा डायमंड क्रॉसिंगवर रुळावरून घसरला. या घटनेत कोणताही प्रवासी जखमी झाला नाही आणि सर्वजण सुरक्षित आहेत, अशी माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली. ही घटना आज सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास घडली. जेव्हा ट्रेन पुणे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर प्रवेश करत होती, त्याचवेळी चौथ्या डब्यातील एक ट्रॉली डायमंड क्रॉसिंगवर रुळावरून घसरली.

# मरीन ड्राईव्ह परिसरात पहाटे भीषण अपघात! वृद्धासह ३ ठार

■ मुंबई

**मरीन** ड्राईव्ह परिसरात आज पहाटे भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या एका वृद्ध व्यक्तीसह दुचाकीस्वार १ तरुण आणि एका तरुणीचा मृत्यू झाला. अपघातानंतर त्यांना जीटी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान तिघांचाही मृत्यू झाला. यामध्ये किशोर लामणे (६६) कृष्णा देसाई (१९) आणि चांदणी शेख (१८) यांचा समावेश आहे.

गिरगाव परिसरातील ज्येष्ठ व्यक्ती पहाटे सहा वाजता मरीन ड्राईव्ह येथे मॉर्निंग वॉकसाठी आलेले होते. त्यावेळी रस्त्यावरून दोन दुचाकी जात होत्या. या दोन्ही दुचाकींनी ज्येष्ठ व्यक्तीला धडक दिली. त्यामुळे बाईकवरील तरुण-तरुणीही खाली पडले. दोन्ही दुचाकींचा वेग जास्त असल्याने वृद्ध व्यक्ती आणि दुचाकींवर असणाऱ्यांना गंभीर इजा झाली होती. हा अपघात इतका भीषण होता की, दोन्ही बाईकची चाक, सायलेन्सर आणि चेसिसचा भाग निखळून पडला होता. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी जखमींना रुग्णालयात नेले. मात्र उपचारादरम्यान तिघांचा अंत झाला.

# शरद पवार गटाचे माजी मंत्री विनायक पाटील यांचा शिंदेसेनेत प्रवेश

**ठाणे -** ठाण्यातील शिंदे गटाच्या कार्यालयात शरद पवार गटाचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष आणि माजी राज्यमंत्री विनायक पाटील यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह शिंदेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. त्यांच्यासोबत लातूरमधील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केल्याने लातूर जिल्ह्यात शरद पवार गटाला मोठे खिंडार पडले आहे.

विनायक पाटील यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात लातूर जिल्ह्यातील कारेगावचे ग्रामपंचायत सदस्य म्हणून केली होती. १९९९ मध्ये ते पहिल्यांदा विधानसभेवर निवडून आले आणि उत्पादन शुल्क, जलसंधारण आणि खार जमिनी यांसारख्या खात्यांचे राज्यमंत्री म्हणून काम पाहिले.

# रखडलेल्या १७ विधान परिषद आमदारांच्या निवडणुका जूनमध्ये

■ मुंबई

**स्थानिक** स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडून जाणाऱ्या विधान परिषदेच्या तब्बल १७ जागा रिक्त आहेत. ४ वर्षांपासून टप्प्या-टप्प्याने या जागा रिक्त झाल्या आहेत. आता १२ मे रोजी विधान परिषदेच्या ९ जागांची आणि एका पोटनिवडणुकीच्या जागेची निवडणूक झाल्यानंतर जून महिन्यात उर्वरित सर्व १७ जागांची निवडणूक घेतली जाण्याची शक्यता असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातील सूत्रांनी दिली.

या १७ मतदारसंघाच्या नावाची आणि संबंधित मतदारसंघातील मतदारांच्या संख्येची माहिती आयोगाला पाठवण्यात आली आहे. काही मतदारसंघात जिल्हा परिषदेचे सदस्य नसले तरी येथे ७५ टक्के मतदार संख्येची पूर्तता होत असल्याने निवडणूक घेण्यात कोणतीही अडचण नसल्याचे सूत्रांनी सांगितले. त्यामुळे या निवडणुकीचा कार्यक्रम मे महिन्यात जाहीर होऊन प्रत्यक्ष मतदान जूनच्या दुसऱ्या, तिसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे.












# दहशतवादी हल्ल्यात मालीच्या संरक्षण मंत्र्यांचा मृत्यू

**बामाको** - मालीतील राजधानी बामाकोच्या बाहेरील भागात असलेल्या मालीचा सर्वात मोठा काटी लष्करी तळवर दहशतवाद्यांनी गोळीबारासह दोन मोठे स्फोट केले. त्यासोबत या तळावरील मालीचे संरक्षण मंत्री सादियो कामारा यांच्या निवासस्थानावर हल्ला केला. त्यात त्यांचा मृत्यू झाला. या हल्ल्यामुळे अमेरिकन दूतावासाने तत्काळ सुरक्षा सूचना जारी केली आहे. बामाकोमधील अमेरिकन नागरिकांना घराबाहेर न पडण्याचे आणि विमानतळाकडे जाणारे सर्व प्रवास टाळण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

### ई- निविदा सूचना क्र. ०१/२०२६-२०२७

**Main Portal : https://mahatenders.gov.in,**
**MHADA Portal: https://mhada.gov.in**

कार्यकारी अभियंता (फ/ उत्तर) विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, दुसरा मजला, सनशाईन प्लाझा, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग, दादर (पू), मुंबई- ४०००१४, यांचेकडे मुंबई शहर जिल्हा अंतर्गत Deputy District Registar यांचेकडे उचित वर्गात नोंदणीकृत असलेल्या म्हाडा नोंदणीकृत पात्र मजुर सहकारी संस्थांकडुन **एकुण ०१** कामाकरीता बी - १ (Percentage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. **निविदा** कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

निविदा विक्री आणि स्विकृती दि.२८/०४/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता सुरु होऊन दि.०५/०६/२०२६ रोजी संध्याकाळी ०४ वाजता बंद होईल. तांत्रिक बोली दि.०६/०६/२०२६ रोजी दुपारी ४:०० नंतर उघडण्यात येतील. तसेच पात्र निविदाची आर्थिक बोली दि. ०७/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० नंतर उघडण्यात येतील.

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवले आहेत. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**टिप: १ विस्तृत ई-निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.**
**टिप: २ निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक/बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.**

Follow us:@mhadaofficial

CPRO/A/340

सही/-
**कार्यकारी अभियंता फ/ उत्तर विभाग**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ**

**म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**

## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता
## सा.बां. विभाग, पालघर
### ई-निविदा सुचना क्रमांक - ०२ सन २०२६-२०२७

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी, पालघर- बोईसर रोड, ता.जि. पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून खालील कामांकरीता **'ब-१'** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०३ (तीन) काम समाविष्ट आहे.

टिप- या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.
**1) https://pwd.maharashtra.gov.in/ 2 ) https://mahatenders.gov.in**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. लक्ष (रुपये) (जी.एस.टी. वगळून) | अंदाजित रक्कम रु. लक्ष (अक्षरी) (जीएस.टी. वगळून) | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | पालघर जिल्हाधिकारी कार्यालय येथील तळमजल्यावरील बाल न्याय मंडळ विभागाचे नुतनीकरण करणे. ता. जि. पालघर | रु.१७९६८०६/- | अक्षरी रु सतरा लक्ष श्याहण्णव हजार आठशे सहा मात्र | ४२३५ ०७३४ ५२ महिला! व बाल विकास विभागाची मोठी बांधकामे |
| २ | नाबार्ड - ३१ हरणवाडी मातृकी देवालय प्रजिमा क्र. ४ चिंचपाडा माहिम चिंतुपाडा नवली वरखुंटी कमारे वाकसई ते नवघर रस्ता, प्रजिमा- ११५ सा.क्र. ११/४२० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे. ता. जि. पालघर | रु.९१३७०६१/- | अक्षरी रु एक्याण्णव लक्ष सदोतीस हजार एकसष्ट मात्र | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०५ कर्ज सहाय्यातून कार्यान्वित केलेली कामे ०५ ०१ मोठी बांधकामे नाबार्डच्या कर्ज सहाय्यातून कार्यान्वित केलेली कामे कार्यक्रम ५०५४०७५२ |
| ३ | नाबार्ड - ३१ हरणवाडी मातृकी देवालय प्रजिमा क्र. ४ चिंचपाडा माहिम चिंतुपाडा नवली वरखुंटी कमारे वाकसई ते नवघर रस्ता, प्रजिमा- ११५ सा.क्र. १०/५५० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे. ता. जि. पालघर | रु.९६०६३६९/- | अक्षरी रु श्याहण्णव लक्ष सहा हजार तिनशे एकोणसत्तर मात्र | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०५ कर्ज सहाय्यातून कार्यान्वित केलेली कामे ०५ ०१ मोठी बांधकामे नाबार्डच्या कर्ज सहाय्यातून कार्यान्वित केलेली कामे कार्यक्रम ५०५४०७५२ |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

वरील कामाची ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. **२८/०४/२०२६** ते दि. **७/०५/२०२६** पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. **११/०५/२०२६** शक्य झाल्यास सकाळी **११.००** नंतर.

जा.क्र. सा.बां.वि/पालघर/निविदा/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालया शेजारी,
पालघर- बोईसर रोड, ता. जि. पालघर (पश्चिम)- ४०१ ४०४
दिनांक :
क्रमांकः आरओसी-२०२६-२७/क्र.५/सी ४४३

सही/-
**(स.पां. किणी)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर**

## निरलॉन लिमिटेड

सीआयएन L17120MH1958PLC011045
नोंदणीकृत कार्यालयः पहाडी गाव, ऑफ पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०० ०६३.
दूरध्वनी क्रमांकः + ९१ (०२२) ४०२८ १९१९/२६८५ २२५७/५८/५९
ईमेलः info@nirlonltd.com, वेबसाइटः www.nirlonltd.com

### सूचना

सेबी एलओडीआर विनियमन, २०१५ च्या विनियमन ३० नुसार, आणि एनएसई सूचिबद्धता विभागाच्या परिपत्रक संदर्भ क्र. एनएसई/सीएमएल/७३७९७ दिनांक १७.०४.२०२६ च्या आधारे याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीचे समभाग नॅशनल स्टॉक एक्सचेंज **(एनएसई)** द्वारे दि. २० एप्रिल, २०२६ पासून एनएसईवरील **"परमिटेड टू ट्रेड"** या श्रेणीअंतर्गत स्वीकारण्यात आले आहेत.

- एनएसईवर कंपनीची निशाणीः **निरलॉन**
- कंपनीचे नावः **निरलॉन लिमिटेड**
- आयएसआयएनः **INE910A01012**

ही जाहीर सूचना तमाम भागधारकांच्या सर्वोच्च हितास्तव प्रसिद्ध करण्यात येत आहे. **हे लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे की, कंपनीचे समभाग केवळ बीएसई लिमिटेडवर सूचीबद्ध आहेत.**

निरलॉन लिमिटेडसाठी
सही/ -
जास्मिन के. भावसार
कंपनी सचिव, उपाध्यक्ष (कायदा) आणि अनुपालन अधिकारी
मुंबई, दि. २७ एप्रिल, २०२६ एफसीएस ४१७८

रामेश्वर मिडिया

## फॉर्म क्र. यूआरसी-२

**प्रकरण XXIच्या भाग I अन्वये नोंदणीकरणाबाबत सूचना देणारी जाहिरात [कंपनी कायदा, २०१३ चे कलम ३७४(बी) आणि कंपनी (नोंदणीकरिता प्राधिकृत) विनियमन, २०१४ च्या विनियमन ४(१) नुसार]**

१. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ३६६ च्या उप-कलम (२) अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, निबंधकांकडे असा अर्ज करण्यात आला आहे की, नायशा गोल्ड, भागिदारी संस्थेचे कंपनी कायदा, २०१३ च्या प्रकरण XXIच्या भाग I अन्वये भागांद्वारे मर्यादित कंपनी म्हणून नोंदणीकरण होऊ शकते.
२. कंपनीची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेतः
शुद्ध धातू, सोने, चांदी, प्लॅटिनम आणि इतर मौल्यवान धातू व मिश्रधातू यासंबंधी व्यवहार, व्यापार, आयात, निर्यात, खरेदी, विक्री, उत्पादन, प्रक्रिया, रचना, शुद्धीकरण आणि अन्यथा, तसेच सोन्याचे दागिने, चांदीच्या वस्तू, हिऱ्यांचे दागिने, मौल्यवान व अर्ध-मौल्यवान खडे, रत्ने आणि सर्व प्रकारच्या दागिन्यांचे व वस्तूंचे उत्पादन, रचना, प्रक्रिया, खरेदी, विक्री, आयात, निर्यात आणि व्यवहार करणे, या संबंधी मे. नायशा गोल्ड (भागीदारी संस्था) या संस्थेचा चालू व्यवसाय हाती घेणे आणि वरील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व संलग्न, आनुषंगिक व पूरक उपक्रमांसह, कटिंग, पॉलिशिंग, सेटींग, ग्रेडिंग, प्रमाणीकरण, हॉलमार्किंग, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि विपणन यांसारख्या सर्व संबंधित सर्व उपक्रमांची अंमलबजावणी करणे.
३. प्रस्तावित कंपनीचा निवेदन मसुदा आणि संघटनेची घटनेची प्रत सी-२६, बेलिराम इंडस्ट्रीयल इस्टेट, एस. व्ही. रोड, पेट्रोल पंप जवळ, दहिसर (पूर्व), मुंबई-४०००६८ येथे पाहता येईल.
४. याद्वारे सूचना देण्यात येते की, कोणाही व्यक्तीचा या अर्जास आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचे आक्षेप लेखी स्वरुपात निबंधक यांना मध्यवर्ती नोंदणीकरण केंद्र (सीआरसी), भारतीय कॉर्पोरेट व्यवहार संस्था (आयआयसीए), प्लॉट क्र. ६, ७, ८, सेक्टर ५, आयएमटी मानेसार, जिल्हा गुरगाव (हरयाणा), पिन कोड - १२२०५० येथे या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत कळवावे आणि त्याची प्रत कंपनीस त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठवावी.

दिनांक २७ एप्रिल, २०२६

नायशा गोल्ड करिता
जिगर आर धनक
केतन आर धनक

## purple FINANCE

**कार्यालयः** पर्पल फायनान्स लिमिटेड, ७०५/७०६, ७ वा मजला, हॉलमार्क बिझनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
**दूरध्वनीः** ०२२-६९१६५१२३, **वेबसाइटः** www.purplefinance.in

### मागणी सूचना

ज्याअर्थी, पर्पल फायनान्स लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी, ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय ७०५/७०६, ७ वा मजला, हॉलमार्क बिझनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ येथे आहे आणि भारतातील विविध ठिकाणी शाखा आहेत (यापुढे 'पीएफएल' म्हणून संदर्भित) ही कंपनी, कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नोंदणीकृत आहे आणि पीएफएल ही सरफायसी कायद्याअंतर्गत प्रतिभूत धनको असल्याने आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या कलम १३(२) सहवाचिता नियम २ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदारांना / सह-कर्जदारांना सूचनेत नमूद केलेली रक्कम नोटिसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत पुढील व्याजासह परत करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना जारी केली आहे, त्याव्यतिरिक्त, खाली सूचीबद्ध केलेल्या कर्जदारांच्या माहितीच्या उद्देशाने, या जाहीर सूचनेद्वारे कर्जदारांना कळविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव/कर्ज खाते क्र./शाखा | ज्या प्रतिभूत मालमत्तेवर स्वारस्य निर्माण झाले आहे त्या मालमत्तेचे वर्णन | एनपीए दिनांक | पाठवलेली मागणी सूचना दिनांक आणि थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | १. विशाल चंद्रकांत देसले (कर्जदार) २. चंद्रकांत गणपत देसले (सह-कर्जदार) ३. पुष्पा चंद्रकांत देसले (सह-कर्जदार) **कर्ज खाते क्र.:** पीएफएलएसएलकेएएल ०००११०२ **शाखा :** कल्याण | घर क्र.४८४, मोजमाप १३२० चौ.फूट म्हणजेच १२२.६३ चौ. मीटर, जयगाव, खेवारे, पोस्ट मिल्हे, मुरबाड, हनुमान मंदिराशेजारी, ठाणे, ग्रामपंचायत खेवारे यांच्या हद्दीत, तालुका मुरबाड व जिल्हा ठाणे - ४२१४०१. **चतु:सीमा:** पूर्व - श्री. समाधान दामोदर रसाड यांचे घर, पश्चिम - मोकळी जागा, दक्षिण - मोकळी जागा, उत्तर - श्री. संजय मोतीराम देसले यांचे घर. | ०९.०४. २०२६ | १३.०४.२०२६ आणि रू. १५८८८५०/- |

म्हणून, वर नमूद केल्याप्रमाणे, कर्जदार/सह-कर्जदारांना सूचना देण्यात येत आहे, ज्यामध्ये त्यांना ही सूचना प्रकाशित झाल्यापासून ६० दिवसांच्या आत संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराविरुद्ध वर दर्शविल्याप्रमाणे एकूण थकबाकीची रक्कम भरण्याचे आवाहन केले आहे. संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराने एकूण थकबाकीची रक्कम आणि पुढील व्याज भरण्यात अयशस्वी झाल्यास, पीएफएलला वर वर्णन केल्याप्रमाणे मालमत्तेवरील प्रतिभूत व्याज लागू करण्यासाठी कलम १३(४) अंतर्गत कारवाई करण्यास भाग पाडले जाईल, कायद्यानुसार आणि येथे बनवलेल्या नियमांनुसार विहित केलेल्या इतर पद्धतीने नोटीस बजावण्यासाठी देखील पावले उचलली जात आहेत. आपणास हे नमूद करून कळविण्यात येते की, सरफायसी कायद्याच्या कलम १३(८) मध्ये तपशीलवार सांगितल्याप्रमाणे, जाहीर लिलावासाठी किंवा विक्रीच्या मार्गाने हस्तांतरणासाठी खाजगी कराराची सूचना प्रकाशित होण्याच्या तारखेपूर्वी कधीही पीएफएल द्वारे केलेल्या खर्चासह संपूर्ण देय रक्कम, शुल्क आणि खर्च भरल्यानंतर सदर गहाण ठेव परत मिळवता येते.

लक्षात ठेवा की सरफायसी कायद्याच्या एस-१३(१३) च्या अटींनुसार, तुम्हाला प्रतिभूत मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास आणि/किंवा व्यवहार करण्यास प्रतिबंधित केले आहे.

**दिनांक: २८.०४.२०२६, ठिकाण: ठाणे** **सही/- प्राधिकृत अधिकारी पर्पल फायनान्स लि.**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, आमच्या अशिलांच्या सूचनेअंतर्गत, मी याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या मालमत्तेच्या ("मालमत्ता") संदर्भात एकमेव आणि अनन्य मालक असल्याचा दावा करणाऱ्या **श्री. शोएब अकबरअली मोईयादी ("विद्यमान मालक")** यांच्या शीर्षकाची तपासणी आणि पडताळणी करीत आहे. सदर मालमत्ता सर्वप्रथम श्री. अकबरअली शेख गुलामअली मोईयादी आणि सौ. सकिना अकबरअली मोईयादी या पती आणि पत्नीच्या मालकीची होती, आणि प्रेम आणि आपुलकी म्हणून आणि कोणत्याही आर्थिक मोबदल्याशिवाय सदर मालमत्तेमधील त्यांचे सर्व संबंधित हक्क, शीर्षक आणि हितसंबंध त्यांचा एक मुलगा म्हणून कायमस्वरुपी आणि केवळ विद्यमान मालकांच्या नावे हस्तांतरित केले होते.

सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या आणि/किंवा शीर्षक दस्तऐवजांच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, अभिहस्तांकन, वाटप, गहाणवट, प्रभार, धारणाधिकार, आर्थिक मोबदला, करार, हक्कसोड, त्याग, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, भेट, देखभाल, वहिवाट, न्यास, भाडेकरू, पोट-भाडेकरू, लिव्ह ॲण्ड लायसन्स, काळजीवाहू आधारे, भोगवटा, ताबा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करारपत्रे, विकास अधिकार, प्रकल्प व्यवस्थापन करारपत्र, विकास व्यवस्थापन करारपत्र, शीर्षक दस्तऐवजांच्या ठेवीचे ज्ञापन, गहाणवट, प्रभार, तारण या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणतेही दावे, आक्षेप, हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध आणि/किंवा कशाही प्रकारची कोणतीही मागणी असणाऱ्या सर्व व्यक्ती(व्यक्तीं)नी निम्नस्वाक्षरीकार यांना त्याबाबत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात, यामधील दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सादर करावे, असे न केल्यास, असा हिस्सा, हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा मागणी दुर्लक्षित करण्यात येईल आणि सोडून दिली आणि/किंवा त्याग केली असे समजण्यात येईल.

**वरील उल्लेखित अनुसूची**
*(सदर मालमत्तेचे वर्णन)*

(i) मुंबई शहराच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्याच्या हद्दीमधील सी.एस. क्र. ४/१६३४, "ई" प्रभाग, २८ मोटलीबाई स्ट्रीट, मुंबई-४००००८ येथे उभ्या नून बेकर अपार्टमेन्ट्स ("**इमारत**") या इमारतीच्या ६ व्या मजल्यावर स्थित निवासी सदनिका क्र. १२ (६०२), मोजमाप ७० चौ. मी. (७५३.४८ चौ.फू.) कार्पेट क्षेत्रफळ (बाल्कनी क्षेत्र वगळता), (ii) नून बेकर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.च्या भाग प्रमाणपत्र क्र. ०१२ मध्ये समाविष्ट (अ) डिस्टिंक्टिव्ह क्र. ०५६ ते ०६० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) प्रत्येकीचे ५ (पाच) पूर्णतः भरणा केलेले समभाग, आणि (ब) डिस्टिंक्टिव्ह क्र. १५१ ते १५५ (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) प्रत्येकीचे ५ (पाच) पूर्णतः भरणा केलेले समभाग, दोन्ही (अ) आणि (ब) एकूण १० (दहा) समभाग ("**समभाग**"), आणि (iii) सदर इमारतीच्या तळमजल्यावर स्थित एक गॅरेज/बंद कार पार्किंग जागा मोजमाप १३.९४ चौ.मी. (१५० चौ.फू.) ("**कार पार्किंग जागा**").

दिनांकः २८.०४.२०२६
ठिकाणः मुंबई

सही/-
**श्री. रोहित वसंत शिंदे**
ॲडव्होकेट मुंबई उच्च न्यायालय
द्वारा मुकेश एच. जैन, कार्यालय क्र. ए/११८, १ला मजला,
नारायण उद्योग भवन, चिवडा गल्ली, लालबाग, मुंबई ४०००१२.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

### मुदतवाढ सूचना
### ई निविदा सूचना क्र. ०२/२०२६-२०२७ (मुंबई) करीता

दिनांक १०/०४/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक ग्लोबल टाईम्स, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्धत करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | तळोजा पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... तळोजा औद्योगिक क्षेत्र व तळोजा फीडर रस्त्यामधील रस्त्यालगतचे, मोकळे भूखंड/जागा, राखीव भूखंड आणि सुविधा भूखंडावरील अतिक्रमण हटवणे. | ₹ १९,११,०१०.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०६/०५/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करून किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
### निविदा सूचना क्र. ९ / २०२६-२०२७

आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, हे CPWD or State PWD, CIDCO, MCGM, Railways, MJP etc यांचेकडे काम केलेल्या अनुभवी कंत्राटदारांकडून / कंपनीकडून खालील कामासाठी सी नमुन्यात सीलबंद निविदा ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे मागवित आहेत. या कामांची सविस्तर निविदा सूचना व कोरे निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २८/०४/२०२६ ते दि. २५/०५/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. निविदा ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे दि. २५/०५/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यत भरता येतील. शक्य झाल्यास निविदा दि. २६/०५/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता निविदाकारांच्या समोर उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा फॉर्म फी रक्कम रूपये | अनामत रक्कम रूपये | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | डोंबिवली पश्चिम येथील रेतीबंदर रोडवरील मोठागाव ठाकुर्ली येथील दिवा वसई रेल्वे ट्रॅकवरील लेव्हल क्रॉसिंग क्र. ०१ (कि. मी. ५०/०९-१०) च्या जागी प्रस्तावित आरओबीच्या पोहोच मार्गाचे बांधकाम (कंत्राटदाराच्या स्वतःच्या डिझाइन आणि रेखाचित्रांसह) | ३,०००/- अधिक GST = रु. ३५४०/- (रुपये तीन हजार पाचशे चाळीस मात्र) | ३५,४४,०००/- (रुपये पस्तीस लक्ष चव्हेचाळीस हजार मात्र) | २४ महिने |

निविदा पूर्व बैठक दि. १२/०५/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता शहर अभियंता, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचे दालनात होईल. निविदा पूर्व बैठकीसाठी पुरक माहिती उपलब्ध करणे करीता प्रश्नावली सादर करण्याचा अंतिम कालावधी दि. १२/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजे पर्यत असेल.

कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार आयुक्त / प्रशासक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखून ठेवला आहे व त्यांचा निर्णय कायदेशीररित्या सर्व निविदाकारांसाठी बंधनकारक राहील.

कडोंमपा/जसंवि/मुका/७१
दिनांकः २७/०४/२६

सही/-
**(अनिता परदेशी)**
**शहर अभियंता**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

## MAHAVITARAN — TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

E-Tender is invited from eligible registered contractors/Agencies for following works.

| Sr. No. | Tender No. | Particulars | Estimated Tender Amount | Tender fee | EMD (0.5% of Tender amount) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | SE/KC-I/HR/OS/2026-2027/T-02 for Kalyan East Division | Work Contract for providing Outsource Manpower - Skilled and Unskilled (Office Assistant, Electrical Assistant & Operator) at offices of Kalyan East Division under Kalyan Circle No. I. | Rs. 7,21,59,310.32/- | Rs. 5000/- + 18% GST = 5900/- | Rs. 3,60,797/- |
| 2 | SE/KC-I/HR/OS/2026-2027/T-03 for Kalyan West Urban Division | Work Contract for providing Outsource Manpower - Skilled and Unskilled (Office Assistant, Electrical Assistant & Operator) at offices of Kalyan West Urban Division under Kalyan Circle No. I. | Rs. 3,51,97,638.12/- | Rs. 5000/- + 18% GST = 5900/- | Rs. 1,75,988/- |
| 3 | SE/KC-I/HR/OS/2026-2027/T-04 for Dombivli Urban Division | Work Contract for providing Outsource Manpower – Skilled and Unskilled (Office Assistant, Electrical Assistant & Operator) at offices of Dombivli Urban Division under Kalyan Circle No. I. | Rs. 4,80,23,675.52/- | Rs. 5000/- + 18% GST = 5900/- | Rs. 2,40,118/- |
| 4 | SE/KC-I/HR/OS/2026-2027/T-05 for Konkan Region Office, Kalyan Zone Office, Kalyan Circle-I Office & Kalyan Testing Division. | Work Contract for providing Outsource Manpower – Skilled and Unskilled (Office Assistant, Electrical Assistant & Operator) at offices of Konkan Region Office, Kalyan Zone Office, Kalyan Circle-I Office & Kalyan Testing Division. | Rs. 2,13,88,411.80/- | Rs. 5000/- + 18% GST = 5900/- | Rs. 1,06,942/- |

TERMS & CONDITIONS:-

| | | |
|---|---|---|
| 1) | Date of sale of Tender-02 for Kalyan East Division (Only on website) | 27.04.2026 to 19.05.2026 |
| 2) | Last date of submission of Tender-02 for Kalyan East Division (Only on website) | 19.05.2026 at 15.00 pm |
| 3) | Date of opening of Tender-02 for Kalyan East Division (Technical Bid) | 19.05.2026 at 16.00 pm |
| 4) | Pre-bid meeting for Tender-02 for Kalyan East Division | 30.04.2026 at 11.00 am |
| 5) | Date of sale of Tender T-03 for Kalyan West Urban Division, T-04 for Dombivli Urban Division & T-05 for Konkan Region Office, Kalyan Zone Office, Kalyan Circle-I Office, & Kalyan Testing Division. (Only on website) | 27.04.2026 to 12.05.2026 |
| 6) | Last date of Tender T-03 for Kalyan West Urban Division, T-04 for Dombivli Urban Division & T-05 for Konkan Region Office, Kalyan Zone Office, Kalyan Circle-I Office, & Kalyan Testing Division. (Only on website) | 12.05.2026 at 15.00 pm |
| 7) | Date of opening of Tender T-03 for Kalyan West Urban Division, T-04 for Dombivli Urban Division & T-05 for Konkan Region Office, Kalyan Zone Office, Kalyan Circle-I Office, & Kalyan Testing Division. (Technical Bid) | 12.05.2026 at 16.00 pm |
| 8) | Pre-bid meeting for Tender T-03 for Kalyan West Urban Division, T-04 for Dombivli Urban Division & T-05 for Konkan Region Office, Kalyan Zone Office, Kalyan Circle-I Office, & Kalyan Testing Division. | 30.04.2026 at 11.00 am |
| 9) | Tender without EMD will not be accepted. EMD exemption will be applicable to Appretice Sahakari Sanstha/ Berojgar Seva Sahakari Sanstha as per Corporate Office, Mumbai Circular No.671 dt.06.01.2025 subject to GoM Notification. | |

The Tender documents can be downloaded from our website https://etender.mahadiscom.in from 27.04.2026.
Contact Person: 1. The Executive Engineer (Admin.) Kalyan Circle No. I, Mobile No. 8879626131
2. The Manager (HR), Kalyan Circle No. I, Mobile No. 8879626145
The undersigned reserves right to reject any or all offers without assigning any reasons thereof.

PR No. 105/2026

Sd/-
**Superintending Engineer, Kalyan Circle – I, Kalyan**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

### मुदतवाढ सूचना क्र. ३
### ई निविदा सूचना क्र. ८६/२०२५-२०२६ (मुंबई) करीता

दिनांक १६/०३/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक हिंदूस्तान टाईम्स, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक खबरें आजतक, मुंबई, दैनिक जागरुक टाईम्स, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्धते बाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | तळोजा औद्योगिक क्षेत्र ... नावडे येथील लेव्हल क्रॉसिंग क्र. १२ - ए वरील रोड ओव्हर ब्रिजच्या (आरओबी) दुरुस्तीची कामे करणे. | ₹ १७,४०,४६,१७५.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०६/०५/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करून किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## PUBLIC NOTICE

Advertisement to be published in the newspaper for conversion of a private company into a public company in the Society Register of NAMAN MIDTOWN A WING PREMISES CO-OP. SOCIETY LTD, Senapati bapat Marg, Prabhadevi, Mumbai-400013

And Conversion of Private Limited Company into a Public Limited Company Before the Regional Director, Ministry of Corporate Affairs Western Region
In the matter of Companies Act, 2013, section of Companies Act, 2013 and rule 41 of the companies (Incorporation) Rules, 2014

Any person whose interest is likely to be affected by this change/ status of the company may deliver or cause to be delivered or send by registered post of his objections supported by an affidavit stating the nature of his interest and grounds of opposition to the Society Office, NAMAN MIDTOWN A WING PREMISES CO-OP. SOCIETY LTD, Senapati bapat Marg, Prabhadevi, Mumbai -400013 within 14 days from the date of publication of this notice with a copy to the applicant company at its registered office at the address mentioned below:
2nd floor, 599, Office No. 207, Kapadia Chamber, JSS Road, Chira Bazar, Mumbai, Maharashtra, India - 400002.

**FOR ARKNINE TECHNOLOGIES LIMITED**
**Sd/-**
**DHRATI HEET JAIN**
**(Director)**
**DIN : 08597320**

## पुणे महानगरपालिका
### भवन रचना विभाग
### निविदा प्रक्रिया कक्ष
### निविदा जाहिरात - नविन कामे

पुणे महानगरपालिका

१) ई-निविदा विक्री कालावधी :- २८/०४/२०२६ दुपारी २.३० वाजेनंतर ते ०७/०५/२०२६ दुपारी २.३० वाजेपर्यंत
२) निविदा स्वीकृती व अंतिम दिनांक व वेळ :- २८/०४/२०२६ दुपारी २.३० वाजेनंतर ते ०७/०५/२०२६ दुपारी २.३० वाजेपर्यंत
३) तांत्रिक बाबींचा लिफाफा उघडणे दिनांक :- ०८/०५/२०२६ दुपारी ३.०० वाजेनंतर

| अ. क्र. | निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत | निविदा संच रुपये | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पी.एम. सी./भवन/ ०३/२०२६-२७ | भवन रचना विभाग | लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारक आवारातील लायब्ररी इमारतीचे अर्धवट कामे पूर्ण करणे | २५४६९३० | २५४६९ | ३ महिने (पावसाळा कालावधीसह) | १३५९ | श्री उमेश कुरे ९८९०४६८९२९ |

अ) पुणे मनपाची वरील कामे ही अनुभवी/मनपा मान्यता प्राप्त/ शासन मान्यता प्राप्त ठेकेदाराकडून (कामासाठीच्या पूर्वपात्रता अटी टेंडर सेटमध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ.बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
ड) ऑनलाईन निविदा प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती भवन विभाग पुणेमनपा येथे मिळेल.
इ) कार्यालयीन आदेश क्र.अतिमआ(वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

जाहिरात क्र. २/६१ दि. २७/०४/२०२६

(स्वाक्षरी/-)
**कार्यकारी अभियंता**
**भवन रचना कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**

मुंबई | मंगळवार
२८ एप्रिल,२०२६
नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

# 'डग डग'चा ट्रेलर प्रदर्शित



नवोदित दिग्दर्शक ऋत्विक पारिक यांच्या 'डग डग' या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून, तो एका विलक्षण जगाची झलक दाखवतो. हा चित्रपट एक सटायर कथा असून तो श्रद्धा, चमत्कार आणि तर्कशास्त्र यांच्यातील सीमारेषेवर भाष्य करतो. अनुराग कश्यप, निखिल अडवाणी, विक्रमादित्य मोटवाने आणि वसन बाला या चार दिग्गज निर्मात्यांनी एकत्र येत या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांसमोर सादर केला आहे. देव कोणते खेळ खेळतो, हे देवालाच ठाऊक, या संवादाने ट्रेलरची सुरुवात होते आणि एका गावकऱ्याच्या मृत्यूच्या घटनेतून कथेचा सूर निश्चित होतो. तो व्यक्ती चालवत असलेली दुचाकी पोलीस ठाण्यातून गायब होते आणि ज्या ठिकाणी त्याचा मृत्यू झाला होता, त्याच ठिकाणी ती वारंवार प्रकट होते.

ट्रेलरमध्ये चित्रपटाचे लहरी आणि जादुई वातावरण स्पष्टपणे जाणवते. छायाचित्रकार (डीओपी) आदित्य एस. कुमार यांनी टिपलेली चित्तवेधक आणि काल्पनिक दृश्ये ऋत्विक पारिक यांच्या पटकथेला अधिक प्रभावी बनवतात. हा चित्रपट ८ मे रोजी भारतीय चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. टोरंटो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात जागतिक प्रीमियर झाल्यानंतर, 'डग डग'ने सांता बार्बरा, मेलबर्न, लॉस एंजेलिस, मामी मुंबई आणि केरळच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांसह अनेक जागतिक मंचांवर आपली मोहोर उमटवली आहे. या चित्रपटात अल्ताफ खान, गौरव सोनी, योगेंद्र सिंग आणि दुर्गा लाल सैनी यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# 'तू या मैं'ची घोडदौड



अभिनेत्री शनाया कपूरने 'आंखों की गुस्ताखियाँ' या चित्रपटातून प्रभावी पदार्पण केल्यानंतर, यंदाच्या वर्षात आणखी एका उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली आहे. यावेळची तिची भूमिका पहिल्या चित्रपटापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. दिग्दर्शक बिजोय नंबियार यांच्या 'तू या मैं' या चित्रपटात तिने आदर्श गौरवसोबत काम केले असून, अवनी या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरच्या भूमिकेसाठी तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. चित्रपटातील तिचा 'तू येडी हो गयी क्या, बच्ची?' हा संवाद सोशल मीडियावर प्रचंड गाजत आहे. यावर मीम्स, रील्स आणि इंटरनेटवरील संभाषणांचा एक भाग झाला आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर जोरदार ट्रेंड करत असून, त्याने भारतात अव्वल स्थान पटकावले आहे. तसेच अनेक आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्येही आपली जागा निर्माण केली आहे. अजूनही १२ देशांमधील टॉप १० चित्रपटांच्या यादीत कायम आहे.

# रिचा चढ्ढा डिटेक्टिव्हच्या भूमिकेत



संजय लीला भन्साळी यांच्या 'हीरामंडी' या भव्य मालिकेतील 'लज्जो' या भूमिकेतून प्रेक्षकांची मने जिंकल्यानंतर, अभिनेत्री रिचा चढ्ढा आता एका वेगळ्या आणि आव्हानात्मक भूमिकेत दिसणार आहे. एका आघाडीच्या ओटीटी मंचासाठी तयार होत असलेल्या गुन्हेगारी थरारक मालिकेत रिचा एका गुप्तहेराची भूमिका साकारणार असल्याचे खात्रीलायक वृत्त समोर आले आहे. या मालिकेचे चित्रीकरण आधीच सुरू झाले असून, रिचाची ही भूमिका अत्यंत गुंतागुंतीची आणि बुद्धीनिष्ठ असणार आहे. एका रहस्यमय गुन्ह्याचा शोध घेणारी ही कथा असून, रिचा या मालिकेचा मुख्य चेहरा असेल. बाळाच्या जन्मानंतर रिचाला काहीतरी पूर्णपणे वेगळे करायचे होते. गुप्तहेराची ही भूमिका तिला भावनिक प्रगल्भता आणि शांत, संयमी अभिनयाची संधी देणारी आहे. या मालिकेचा लूक आणि वातावरण रिचाने आजवर केलेल्या कामापेक्षा अगदी वेगळे असणार आहे.

# रणवीरचा माफीनामा संमत



कर्नाटक उच्च न्यायालयाने बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंगची बिनशर्त माफी स्वीकारली आहे. गेल्या वर्षी एका सार्वजनिक कार्यक्रमात 'कांतारा: चॅप्टर १' चित्रपटातील पात्राची नक्कल केल्यामुळे उद्भवलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर ही माफी मागण्यात आली आहे. अभिनेत्याने दाखल केलेल्या सुधारित प्रतिज्ञापत्राची दखल घेतल्यानंतर न्यायालय आता हे प्रकरण निकालात काढण्याची शक्यता आहे.

न्या. एम. नागप्रसन्ना यांच्यासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. रणवीर सिंगची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील साजन पुवय्या यांनी न्यायालयाला माहिती दिली की, कोणतीही अट न ठेवता नवीन प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे. तसेच, श्रद्धेचा भाग म्हणून संबंधित मंदिराला भेट देण्याचे आश्वासनही अभिनेत्याने दिले आहे.

गोव्यातील ५६ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात केलेल्या वक्तव्यामुळे रणवीर सिंग विरोधात एफआयआर नोंदवण्यात आला होता. या कार्यक्रमात त्याने 'कांतारा' चित्रपटातील पात्राची नक्कल केली होती आणि चामुंडेश्वरी देवीबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याचा आरोप त्याच्यावर होता.

तक्रारदार प्रशांत मेथेल यांच्या म्हणण्यानुसार, या विधानामुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्या होत्या. न्यायालय हे प्रकरण बंद करताना रणवीरच्या मंदिराला भेट देण्याच्या आश्वासनाची नोंद घेईल. ही भेट पुढील चार आठवड्यांत होणे अपेक्षित आहे. तसेच, सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी आणि सेलिब्रिटींनी धार्मिक विषयांवर बोलताना अधिक गांभीर्य राखले पाहिजे, अशी टिप्पणीही न्यायालयाने केली आहे.

# 'गोलमाल ५' च्या चित्रीकरणाला उटीमध्ये सुरुवात



हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात यशस्वी विनोदी फ्रँचायझींपैकी एक असलेल्या 'गोलमाल'चा पाचवा भाग सध्या चर्चेत आहे. अभिनेता अजय देवगणने उटी येथील चित्रीकरणाचा एक रंजक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. यामध्ये चित्रपटातील 'द बॉईज' आणि या मालिकेची ओळख असलेली 'पाच आसनी दुचाकी' पुन्हा एकदा पाहायला मिळत आहे. अजय देवगणने इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये 'गोलमाल'चे सिग्नेचर म्युझिक वापरण्यात आले आहे. यावेळेस सवारी मोठी आहे आणि मनोरंजन त्याहूनही मोठे असेल, असे कॅप्शन त्याने या व्हिडिओला दिले आहे. या पोस्टमुळे चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून मूळ कलाकारांना पुन्हा एकत्र पाहणे ही पर्वणी ठरत आहे. यावेळच्या भागात काही जुन्या चेहऱ्यांचे पुनरागमन झाले असून, काही नवीन कलाकारही सामील झाले आहेत.

## सुरक्षा रक्षकावर चाकू हल्ला मिरा रोडमध्ये तणाव निर्माण

■ मिरा रोड

**नया नगर** परिसरात एका इसमाने दोन सुरक्षा रक्षकांवर चाकू हल्ला करून त्यांना जखमी केले आहे. या घटनेमुळे तणाव पसरला आहे. धार्मिक कारणामुळे हा हल्ला झाल्याची चर्चा आहे. ठाण्याचे दहशतवाद विरोधी पथक या घटनेचा तपास करत आहेत. आरोपीला नया नगर पोलिसांनी अटक केली आहे

मिरा रोड पूर्वेच्या नयानगर परिसरातील अस्मिता ग्रँड मेंशन येथे एका इमारतीचे काम सुरू आहे. तेथे राजकुमार मिश्रा आणि सुब्रोतो सेन हे दोन सुरक्षा रक्षक काम करतात. सोमवारी पहाटे ४ च्या सुमारास जैब अन्सारी (३१) या व्यक्तीने त्यांच्याशी वाद घातला आणि अचानक त्यांच्यावर चाकू हल्ला केला. या हल्ल्यात दोन्ही सुरक्षा रक्षक जखमी झाले आहे. धार्मिक कारणावरून हा हल्ला झाल्याची चर्चा पसरल्याने दहशतवादविरोधी पथक घटनास्थळी रवाना झाले.

दरम्यान, नया नगर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीची ओळख पटवून काही तासातच अटक केली.

## अविवाहित परवानाधारकांच्या मृत्यूनंतर स्टॉल्सचा परवाना आई-वडिलांच्या नावे

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेने स्टॉल्स परवाना हस्तांतरणासंदर्भातील धोरणात बदल करण्याचा निर्णय घेतला. अविवाहित परवानाधारक व्यक्तीचे निधन झाल्यास किंवा ती व्यक्ती काम करण्यास असमर्थ ठरल्यास संबंधित स्टॉल्सचा परवाना आता त्यांच्या आई-वडिलांच्या नावे हस्तांतरित केला जाणार आहे. मात्र, भाऊ किंवा बहिणीच्या नावे परवाना हस्तांतरित करण्यास प्रशासनाने स्पष्ट नकार दिला.

मुंबईत महापालिकेकडून २ बाय १ मीटर स्टॉल्ससाठी परवाने दिले जातात. विद्यमान नियमांनुसार, परवानाधारकाच्या मृत्यूनंतर किंवा असमर्थतेनंतर परवाना पती, पत्नी, मुलगा किंवा मुलगी यांच्या नावे हस्तांतरित केला जातो. मात्र, अविवाहित परवानाधारकांच्या वारसांचा उल्लेख नसल्याने अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे विशाखा राऊत यांनी आई-वडील, भाऊ आणि बहिणींचाही समावेश करण्याची मागणी केली होती.

प्रशासनाने स्पष्ट केले की, स्टॉल्सचा परवाना हा उपजीविकेसाठी दिला जात असल्याने हस्तांतरण करताना कायदेशीर वारसांचा विचार केला जातो. त्यामुळे परवानाधारकाच्या मृत्यूनंतर किंवा असमर्थतेनंतर इतर वारस नसल्यास परवाना आई-वडिलांच्या नावे करण्यासाठी परिपत्रक आयुक्तांच्या स्वाक्षरीसाठी पाठवण्यात आले आहे. मात्र, अविवाहित परवानाधारकांच्या भाऊ-बहिणींचा या धोरणात समावेश करता येणार नसल्याचे प्रशासनाने सांगितले. या निर्णयामुळे अनेक अविवाहित स्टॉलधारक कुटुंबांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

## कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंड बंद करण्याचे कोर्टाचे कडक संकेत

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाने कांजूरमार्ग डम्पिंग ग्राऊंड बंद करण्याचे कडक संकेत दिले. राज्य सरकार आणि मुंबई महापालिकेला सुनावले आहे की, जर डम्पिंग ग्राऊंडमुळे होणारे प्रदूषण आणि मिथेन वायूचे उत्सर्जन रोखण्यासाठी त्वरित आणि ठोस पावले उचलली गेली नाहीत, तर ते डम्पिंग ग्राऊंड बंद करण्याचे आदेश देतील. यासंदर्भात आज पालिकेला न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले होते.

न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी करताना प्रशासनाच्या 'कामचलाऊ' वृत्तीबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे. या डम्पिंग ग्राऊंडमधून बाहेर पडणारा मिथेन वायू आणि दुर्गंधीमुळे स्थानिक रहिवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, ज्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयाने अधिकाऱ्यांना डम्पिंग ग्राऊंडवरील परिस्थिती सुधारण्यासाठी आणि प्रदूषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना सुचवण्यासाठी अखेरची संधी दिली आहे.

## सदा रडते! ठाण्यामध्ये बॅनर सदावर्तेंवर मनसेचा निशाणा

■ ठाणे




**रिक्षा** परवान्यासाठी मराठी भाषा सक्तीच्या राज्य शासनाच्या निर्णयाला विरोध करणाऱ्या वकील गुणरत्न सदावर्ते यांच्याबाबत मनसेने आक्रमक भूमिका घेतली. मनसेकडून ठाण्यातील नितीन कंपनी चौकात लावलेल्या व्यंगचित्रात्मक बॅनरमुळे राजकीय वातावरण तापले.

या बॅनरमध्ये गुणरत्न सदावर्ते यांची खिल्ली उडवत त्यांना 'सदा रडते' असे संबोधले आहे. या बॅनरद्वारे मराठी भाषेच्या सक्तीला विरोध करणाऱ्यांवर मनसेने थेट निशाणा साधला आहे. बॅनरमध्ये मराठी बांधव आणि भगवे झेंडे यांसह मराठी भाषेचा सन्मान ही भूमिका मांडली आहे. 'मराठी भाषेचा सन्मान हाच आमचा स्वाभिमान' असा संदेशही यामध्ये दिला आहे. मनसेच्या मते, महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असल्यास मराठी भाषा आवश्यक आहे.

## आपच्या बंडखोरांच्या भाजपा प्रवेशाला सचिवालयाची मंजुरी

■ नवी दिल्ली

**आम** आदमी पार्टीमध्ये (आप) बंडखोरी करत बाहेर पडलेल्या सात खासदारांना अपात्र ठरवण्याची आपची मागणी राज्यसभा सचिवालयाने आज फेटाळून लावली. सात खासदारांच्या भाजपा प्रवेशाला मान्यता दिली.

आपच्या वतीने राज्यसभा सचिवालयाला पत्र लिहून या बंडखोर खासदारांना अपात्र ठरवण्याची मागणी करण्यात आली होती.त्यामध्ये राघव चढ्ढा, अशोक मित्तल, संदीप पाठक, माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग, स्वाती मालिवाल, राजिंदर गुप्ता आणि विक्रमजीत सिंह साहनी यांचा समावेश आहे. राज्यसभेचे अध्यक्ष राधाकृष्णन यांनी आज त्यांच्या भाजपामध्ये विलीन होण्यास मंजुरी दिली. राधाकृष्णन यांच्या या निर्णयानंतर भाजपाच्या वतीने संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी भाजपामध्ये दाखल झालेल्या सर्व खासदारांचे स्वागत केले. दूरदर्शी नेते नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्र घडवण्याचे काम करणाऱ्या एनडीएमध्ये तुमचे स्वागत आणि तुकडे तुकडे इंडिया आघाडीला राम राम, अशी एक्स पोस्ट रिजिजू यांनी केली.



दादरमधील टिळक उड्डाणपुलाचे रुंदीकरण काम सुरू आहे. या उड्डाणपुलामुळे वाहतूक कोंडी सुटणार आहे. (छाया - दीपक साळवी)

## दोन खासगी बसमध्ये चिरडून चालक ठार ! पाच प्रवासी गंभीर

■ कोल्हापूर

**पुणे-बंगळुरू** महामार्गावर घुणकी फाट्याजवळ महामार्गाच्या बाजूला थांबलेल्या मिनी बसला आराम बसने पाठीमागून धडक दिल्याने दोन बसमध्ये चिरडून मिनी बसचालक जागीच ठार झाला, तर ५ जण गंभीर जखमी झाले.

या अपघातातील मृत चालकाचे नाव तिमय्या बिलीकेरे (२४) असे असून, कर्नाटकातील म्हैसूर जिल्ह्यातील हुणसू येथील रहिवासी होता. हा अपघात काल पहाटे झाला. कर्नाटकातील मंड्या जिल्ह्यातील मेलुकोटे येथील पर्यटक मिनी बस घेऊन सहलीसाठी महाराष्ट्रात आले होते. मुंबई दर्शन करून ते परत आपल्या गावी निघाले होते. पहाटे साडेतीनच्या सुमारास ही बस घुणकी गावच्या हद्दीत आली असता मिनी बस थांबवून चालक लोकेश तिमय्या लघुशंकेसाठी मिनी बसच्या मागील बाजूस गेला. याचवेळी पुण्याहून कोल्हापूरकडे भरधाव निघालेल्या आराम बसने थांबलेल्या मिनी बसला पाठीमागून जोरात धडक दिली. या धडकेत मिनी बसच्या मागे उभा असलेला चालक लोकेश हा बसच्या चाकाखाली सापडून जागीच ठार झाला. तर दोन्ही वाहनांतील कुमार (४५), महेश (४७), कीर्तन (२०) यांच्यासह काही प्रवासी जखमी झाले. अपघातानंतर आराम बस चालक घटना स्थळावरून पसार झाला.

## 'हुतात्मा'मध्ये आंदोलन पेटले नायकवाडी काका-पुतणे संघर्ष

■ सांगली

**वाळवा** तालुक्यातील हुतात्मा साखर कारखान्यातील काका-पुतण्यांमधील संघर्ष शिगेला पोहोचला आहे. पुतणे गौरव नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनासाठी बसलेल्या आंदोलकांनी काल सातव्या दिवशी कारखान्याचे अध्यक्ष असलेले त्यांचे काका वैभव नायकवडी यांच्या केबिनला टाळे ठोकून संताप व्यक्त केला. यावेळी गौरव नायकवडी, केदार



नायकवडी आणि किरणदादा नायकवडी यांनी आजपासून आंदोलनाची दिशा बदलून ते अधिक तीव्र करण्याचे जाहीर केले. कारखाना कार्यक्षेत्रातील १५ गावांतील सभासद आणि शेतकऱ्यांनी काल आंदोलनस्थळी गर्दी केली होती. दिवसभर लोक संतप्त भावना व्यक्त करीत, विद्यमान अध्यक्षांनी कसा-कसा त्रास दिला हे सांगत होते. यावेळी गौरव नायकवडी म्हणाले की, जर एकाही आंदोलकाला त्रास झाला, तर सुट्टी देणार नाही. कँटीन बंद करू नका, कुस्त्या बंद करू नका म्हणून काकांना विनंती केली. त्यांनी कधी ऐकले नाही. मिळेल त्यात पैसा हाणला. अण्णा फुकट आंबे वाटत होते, यांनी ते विकून पैसे मिळविले.

## घाटले गावदेवी उत्कर्ष मंडळाचा ५६ वा कला व क्रीडा महोत्सव


■ मुंबई

**चेंबूरमधील** घाटले गावदेवी उत्कर्ष मंडळाचा ५६ वा भव्य कला व क्रीडा महोत्सव यंदा स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून महिनाभर विविध उपक्रम राबवून साजरा केला जात आहे. या महोत्सवाचा सांगता समारोह आणि महाराष्ट्र दिन व कामगार दिन शुक्रवार १ मे रोजी सत्यनारायण महापूजेने साजरा केला जाणार आहे.

बेस्ट समितीचे माजी अध्यक्ष व माजी नगरसेवक अनिल पाटणकर यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली हा भव्य कला व क्रीडा महोत्सव सुरू आहे. आतापर्यंत या महोत्सवात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये घाटला चषक क्रिकेट, हॉलीबॉल, फुटबॉल, लगोरी, संगीत खुर्ची, कॅरम, वेशभूषा आणि गीत गायन आदींचा समावेश होता. १ मे रोजी दुपारी ३ वाजता सत्यनारायण महापूजा आणि सायंकाळी ७ वाजता नगरसेविका मीनाक्षी पाटणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत महिलांसाठी विशेष हळदीकुंकू समारंभ आयोजित केला.

प्रसिद्ध कलादिग्दर्शक बबन काटवटे यांच्यासह भूषण पाटील,सुरेश परमार यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

## नवाकाळ शब्दकोडे– १५८९



**आडवे शब्द –**

१. प्राचीन ४. अजाण ५. बालकवींची प्रसिद्ध कविता- ‘आनंदी आनंद गडे.....’ १०. नाचगाण्याचा कार्यक्रम ११. नोकरीतील सुट्टी १२. चिकित्सा १५. स्त्री १७. विनासायास १८. भविष्यातील गरजा लक्षात घेऊन केलेली आगाऊ तरतूद २१. जल २३. भित्रा २४. सडेतोड २६. सुख २७. त्या ठिकाणी २९. सोन्याचा शुद्धतेचा अंश ३१. फर्मान ३२. रगेल ३४. तर्कसंगत गोष्ट ३६. विकत घेणे ३७. घ्राणेंद्रिय ३८. कठीण (प्रसंग) ३९. अजिबात, किंचितही ४१. व्रताची सांगता ४४. पश्चिम ४६. जाहीर बैठक ४८. वेदांची संख्या ४९. उचित ५१. अननुभवी ५३. एकाकी ५५. म्हणून, याकरिता ५७. उत्पन्न ६०. हवेली ६१. ‘ऐसे ×× झाले भोंदू, कर्म करोनी म्हणती साधु...’ ६२. किडा ६३. श्रीरामाने, पांडवांनी केलेला यज्ञ ६६. कुरघोडी ६९. पार्वती ७२. वीज, बिजली ७४. मूळ मजकूराची स्वतःकडे ठेवलेली प्रत ७६. पहाटेची वेळ ७८. पूर्वजांनी दिलेले ८१. झाडणी ८२. ‘आनंदाचे डोही आनंद तरंग...’ (संत तुकाराम) ८६. पाण्यात राहणारे प्राणी ८९. बढाया ९१. मऊ, मृदू ९४. शकुन पाहण्याची विद्या ९३. करवंदासारखे छोटे फळ, याचे लोणचे घालतात ९६. ‘रिमझिम पाऊस पडे सारखा, यमुनेलाही पूर चढे, पाणीच पाणी चहूकडे गं बाई ....’ ९९. लिहिता वाचता येणारा १०२. कोवळ्या बांबूपासून बनवलेली लेखणी १०३. टोचणी १०४. नवशिका कवी १०५. दणका

**उभे शब्द –**

२. ‘कशास आई भिजविशी डोळे, उजळ तुझे भाळ...’ (कुसुमाग्रज) ३. दृष्टी ४. इसम, व्यक्ती ५. दुखापत ६. भाजीचे देठ ७. लाल गराचे मोठ्या आकाराचे थंड गुणाचे फळ ८. चौर्यकर्म ९. भांडाभांड ११. पृथ्वी १३. पतंगाचा धारदार दोरा १४. सुग्रीवाचा बंधू १६. आद्य कीर्तनकार १७. बरोबर, च्या सह १८. नामस्मरण २०. गारगोटीचा दगड २१. मैत्री २२. नाजूक वेल, मुलींचे एक नाव २५. भात शिजविण्याचे मोठे भांडे २६. सूर्यापासून प्राप्त २८. वृद्ध पुरुष (अवमानकारक उल्लेख) ३०. वेडपट ३३. प्रथा ३४. सूर्योदयाची वेळ ३५. अनुराग ३७. रोटीचा प्रकार ३८. झेंडा ३९. प्रदेश, टापू ४०. दैत्य ४२. पुन्हा ४३. कंडू ४५. बेलाची पाने ४६. जिवलग ४७. सुविधा ४९. जोराचा वारा ५०. क्षणप्रभा ५२. सांड ५३. पूर्वग्रह ५४. साद ५६. ऐक्य ५८. भडिमार, वर्षाव ५९. नेसलेले वस्त्र ६०. अवस्था ६४. जीत, सरशी ६५. जेव्हा (सं.) ६६. बाणेदार ६७. धूलीकण ६८. रुखरुख ७०. आयुर्वेदिक केशतेलातील उष्ण वनस्पती ७१. भूमी ७३. तिखटाची शेंग ७५. तरुणी ७७. तान ७८. समुद्रमंथनासाठी वापरलेला नाग ७९. ज्याचा पार नाही असे, अमर्याद ८०. दोन नद्या एकत्र येतात ते ठिकाण ८३. वैयक्तिक सुरक्षा देणारा सेवक ८४. व्याधी, रोग ८५. शिष्य ८६. विश्व ८७. पादत्राणांचा सुटसुटीत प्रकार ८८. कोष्टक ९०. शरीर ९१. मुंगूस ९२. मगर ९३अ. घट्टपणा ९५. सहाय्य ९६. काव, तांबडी माती ९७. मौक्तिक ९८. रक्तवाहिनी १००. सूर्य १०१. शेंडी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५८८ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. दासबोध ५. विसावा ८. भव्य १०. काजवा १३. बेचिराख १४. कराल १६. वमन १८. वरकमाई २०. लाकूड २२. घुटका २३. वस्तुस्थिती २४. मधुर २५. कोको २६. शपथ ३१. मलीनता ३२. चरक ३४. कालीमाता ३५. कळतनकळत ३८. शलाका ४०. स्तुती ४१. खाट ४२. लव ४४. शरीर ४५. डेरा ४७. किंवा ४८. फुकट ४९. भडिमार ५२. ठसा ५४. देश ५५. तवकीर ५६. मृगनयना ५८. नाव ६०. स्टेपनी ६१. खग ६२. रत ६३. भूत ६४. नातेवाईक ६५. नयनबाण ६७. पंक ६८. खोक ७०. आग ७१. अट ७३. विचित्र ७५. दास रामाचा हणमंत नाचे ७९. चोप ८०. जास्त ८१. घूस ८२. चतकोर ८४. मेणा ८५. अंदाज ८६. लेक ८७. मणका ८९. नळ ९१. जवान ९३. खवा ९४. दादा ९५. साज ९६. साधक ९७. थवा ९९. हवाईसुंदरी १०१. नीर १०२. राहू १०३. टाक १०४. कसरतपटू

**उभे शब्द** : १. तोचि साधु ओळखावा देव तेथेचि जाणावा २. दाखला ३. बोकड ४. धरा ६. सावकाश ७. वाम ९. व्यवस्थित १०. काक ११. जमाव १२. वाई १५. लघुकोन १७. नवथर १९. रती २१. कूप २५. कोलीत २७. पचका २८. अलीकडे २९. उतारा ३०. चैन ३१. मळवट ३१अ. ताश ३३. कस्तुरीमृग ३६. तट ३७. कलकल ३९. लाठीमार ४३. संभवनीय ४६. राठ ५०. डिकी ५१. संयत ५३. साद्यंत ५५. तपन ५६. मृग ५७. नरक ५८. नाना ५९. वाईट ६१. खण ६३. भूक ६६. बालहट्ट ६७. पंगत ६८. खोट ६९. फूस ७०. आमंत्रण ७१. अचेतन ७२. तूप ७४. त्रस्त ७५. दाणादाण ७६. राघू ७७. मासलेवाईक ७८. नाच ७९. चोर ८३. कोळसा ८४. मेजवानी ८७. मदारी ८८. कासावीस ९०. कोकरू ९२. नथ ९३. खवाटा ९४. दादर ९८. वारा १००. द्युत

# रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी सक्तीला मुदतवाढ

पान १ वरून

सरकार आपल्या भूमिकेवर ठाम आहे.

सरनाईक यांनी मुदतवाढ देण्याची माहिती दिल्यानंतर मनसेचे नेते अविनाश अभ्यंकर म्हणाले की, सरनाईक यांना आरंभशूर म्हणता येईल. आधी सुरुवात करायची आणि नंतर शेपटी घालायची. हे स्वतःला सन्माननीय बाळासाहेबांचे शिवसैनिक समजतात. कशाला उद्यापर्यंत पुढे ढकलले? आधी तेच बोलत होते की, आम्ही जे करतोय ते कायद्याने करतो आहोत. हा कायदाच आहे ना? इतके काय शिकायचे आहे? अग्रलेख लिहायचे आहेत? कविता करायच्या आहेत की, महाराष्ट्राचे प्रबोधन करायचे आहे? फक्त चार वाक्य शिकायची आहेत. कुठे जायचे आहे? पत्ता काय आहे? पैसे किती झाले? उद्या काहीतरी मुदतवाढ देतील. पण महाराष्ट्र हा मराठी भाषेचा आहे. उद्या त्यांनी भूमिका जाहीर केल्यावर सन्माननीय राज ठाकरे त्यांची भूमिका जाहीर करतील. त्यांना काय निर्णय घ्यायचा तो घेऊ दे. पण मराठी भाषेचा अपमान सहन केला जाणार नाही. आम्ही दुसऱ्या राज्यात जाऊन मराठी बोललो तर चालेल का? राज ठाकरे यांनी आज मराठी सक्तीसाठी लढलेल्या मनसैनिकांचा सत्कार केला. अंधेरीत मनसेने मराठी भाषा पुस्तकांचे वाटप केले. मराठी सक्तीला विरोध करणारे सदावर्ते यांच्या विरोधात ‘सदा रडे’ असे बॅनर झळकवले.

मराठी सक्तीच्या विरोधात मोर्चा काढणारे शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय निरुपम यांना भिडलेल्या ११ मनसैनिकांचा मनसेप्रमुख राज ठाकरे आणि युवानेते अमित ठाकरे यांनी आज शिवतीर्थ निवासस्थानी सत्कार केला. शनिवारी निरुपम यांनी हिंदी भाषिक रिक्षा-टॅक्सी चालकांची बाजू घेत सरकारच्या निर्णयाला जोरदार विरोध केला होता. त्यावेळी दहीसरमध्ये मनसैनिकांनी निरुपम यांना घेराव घालत त्यांना जाब विचारला होता. यावेळी झालेल्या राड्यानंतर पोलिसांनी अकरा मनसैनिकांवर गुन्हा दाखल करत त्यांना अटक केली होती. काल त्या सर्वांची न्यायालयाने जामिनावर सुटका केली. या सर्व अकरा मनसैनिकांना राज ठाकरे यांनी शिवतीर्थवर येण्याचे निमंत्रण दिले होते. त्याला साद देत मनसैनिक आज शिवतीर्थ निवासस्थानी आले. त्यावेळी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारत राज ठाकरे यांनी त्यांचा सत्कार केला.

# सुनावणीत सहभागी होणार नाही

पान १ वरून

असलेल्या ऑल इंडिया ॲडव्होकेट्स कौन्सिलच्या कार्यक्रमांना चार वेळा हजेरी लावली होती. त्यामुळे त्यांनी या प्रकरणातून हटले पाहिजे, अशी मागणी केजरीवाल यांनी केली होती.

ती त्यांनी फेटाळल्यानंतर केजरीवाल यांनी त्यांना पत्र लिहिले आहे. या पत्रात केजरीवाल यांनी म्हटले आहे की, निष्पक्ष न्यायनिवाडा करण्याच्या त्यांच्या क्षमतेवर माझा विश्वास उडाला आहे. म्हणूनच मी त्यांच्यापुढील कार्यवाहीतून स्वतःला मागे घेत आहे. मी याचे परिणाम भोगण्यास तयार आहे. गांधीवादी सत्याग्रहाच्या प्रत्येक सद्सद्विवेकबुद्धीच्या कृतीला असेच ओझे वाहावे लागते. माझी सद्सद्विवेकबुद्धी मला दुसरा कोणताही सन्माननीय मार्ग दाखवत नाही. मला आता न्याय मिळण्याची शक्यता धूसर आहे. मलाही तसेच वाटते आहे. त्यामुळे मी आता जस्टीस स्वर्णकांता यांच्याविरोधात मी सत्याग्रह करणार आहे. मी तिथे उभा राहणार नाही, माझा वकीलही असणार नाही. जस्टिस स्वर्णकांता या ज्या काही निर्णय देतील त्याविरोधात काय कायदेशीर पावले उचलायची आहेत. ती उचलायला मी मुक्त आहे. भविष्यात जर त्यांच्यासमोर उभे राहण्याची वेळ आली तर त्यांच्यासह तुषार मेहता, भाजपा नसतील तर त्या प्रकरणाच्या सुनावणीला मी नक्की सामोरे जाईन.

# एआयने मोदींच्या नेतृत्वाला पसंती दिली! शिंदेंची एक्स पोस्ट चर्चेत

**मुंबई - उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांच्या एक्स पोस्टमुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चेला तोंड फुटले आहे. एआयनेही देशाचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी हेच योग्य असल्याचा निर्वाळा दिल्याचा दावा शिंदे यांनी केला. एकनाथ शिंदे यांनी एक्सवर लिहिले की, एआय अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्सने सुद्धा देशाचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी हेच योग्य असल्याचा निर्वाळा दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांच्यापैकी कोणाला पसंती द्यावी अशी विचारणा ‘ग्रोक’ला अनेकांनी केली. त्यावर ‘ग्रोक’ म्हणतो- मी काही भारतीय मतदार नाही. परंतु मोदीजींनी घडवून आणलेली डिजिटल क्रांती आणि भारताला जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून मिळवून दिलेले स्थान यामुळे मोदीजीच सर्वार्थाने पंतप्रधान पदासाठी योग्य व्यक्ती आहेत.

# राज्यात ८५ हजार कृषी सेवा केंद्रांचा बेमुदत संप! शेतकरी अडचणीत

पान १ वरून

तर कृषी केंद्र चालकांना जबाबदार धरणे या विरोधात हे आंदोलन आहे. किरकोळ खत विक्रेत्यांवर लादलेल्या जाचक अटींमुळे त्यांना व्यवसाय करणे कठीण झाले आहे. याशिवाय, कीटकनाशक कंपन्या एक्सपायरी मटेरियल परत घेत नाहीत. नवीन बियाणे आणि कीटकनाशक कायद्यांमुळे विक्रेत्यांवर अन्याय होत आहे. त्यामुळे सरकारने तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल असे केंद्र चालकांनी सांगितले.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी २८ एप्रिल रोजी मुंबईत बैठक बोलावली आहे. मागण्यांवर ठोस लेखी तोडगा निघाल्यानंतरच आंदोलन मागे घेण्याची भूमिका संघटनेने स्पष्ट केली आहे. दरम्यान, या संपाचा थेट फटका शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता आहे. खरिप हंगामाची पेरणी जवळ आली असून, शेतकरी सध्या खते आणि बियाण्यांची खरेदी करत आहेत. अशा वेळी कृषी सेवा केंद्र बंद राहिल्यास आवश्यक साहित्य मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे शेतकरी वर्गात चिंता व्यक्त केली जात आहे.

## जाहीर सूचना

येथे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की फारूक इब्राहिम ट्रस्ट तसेच फारूक इब्राहिम फॅमिली ट्रस्ट म्हणून देखील ज्ञात, जो मे.कॉन्डोर इंटेरियर्स या भागीदारी फर्मचा भागीदार होता, ज्याचे मुख्य व्यवसायाचे ठिकाण ब्लू फ्लेम अपार्टमेंट्स, प्लॉट क्र. ५१६, स्वामी विवेकानंद रोड, मुंबई – ४०० ०५० येथे आहे, त्यांनी दिनांक २४ एप्रिल, २०२६ पासून सदर भागीदारीतून निवृत्ती/राजीनामा दिलेला आहे. फर्ममधील उर्वरित भागीदारांनी भागीदारी करारातील अटी व शर्तींनुसार वरील निवृत्ती/राजीनामा विधिवत स्वीकारलेला आहे.

त्यानुसार, फारूक इब्राहिम ट्रस्ट तसेच फारूक इब्राहिम फॅमिली ट्रस्ट म्हणून देखील ज्ञात हे सदर फर्मचे भागीदार राहणार नाहीत आणि सदर दिनांकानंतर फर्मकडून करण्यात येणाऱ्या कोणत्याही कृती, कृत्ये, व्यवहार किंवा दायित्वांसाठी ते जबाबदार राहणार नाहीत. उर्वरित भागीदार सदर फर्मचा व्यवसाय त्याच नावाने व पद्धतीने पुढे चालू ठेवतील.

वरील बदलासंदर्भात कोणत्याही व्यक्तीला काही हरकत किंवा दावा असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत वरील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात फर्मला कळवावे.

दिनांक : २८ एप्रिल, २०२६
ठिकाण : मुंबई

मे. कॉन्डोर इंटेरियर्स करिता

# राज्यावर पाणीटंचाईचे सावट

पान १ वरून

परिस्थिती आणखी कठीण होण्याची शक्यता आहे.

राज्यातील तापमान अनेक भागांत ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. त्यामुळे धरणांमधील पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत आहे. मध्यम आणि लघु प्रकल्पांची स्थिती अधिकच बिकट असल्याचे सांगितले जात आहे. राज्यातील १३८ मोठ्या धरणांमध्ये सध्या १२,४२३ द.ल.घ.मी. पाणी उपलब्ध असले तरी मे अखेरपर्यंत हा साठा आणखी खाली जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, केवळ टँकरमुक्त गावे जाहीर करण्यापेक्षा आता शहरी आणि ग्रामीण भागात पाण्याचे समन्यायी वाटप, काटकसरीचा वापर आणि सूक्ष्म नियोजन यावर भर देण्याची गरज व्यक्त होत आहे.

## जाहीर सूचना

जनतेस माहिती देण्यात येत आहे की श्रीमती पद्मावती रघुनाथ जगताप राहणारः रूम नं. ९०४, ९ वा मजला, बिल्डिंग नं.१०, घरकुल एसआरए गृहनिर्माण हौ. सोसायटी, सदानंद हासु ताडेल मार्ग प्रभादेवी, मुंबई ४०००२५, सदर रुम त्यांच्या नावे असून त्यांचे दिनांक २३/०४/२०२३ रोजी निधन झालेले असून वारस हक्काप्रमाणे त्यांचा मुलगा **श्री. प्रकाश रघुनाथ जगताप** यांनी सदर रूम त्यांचे नावे करण्याचे ठरविले आहे.

तरी या जाहीर नोटीसने जनतेस कळविण्यात येत आहे की वरील रुम लोकांच्या व्यतिरिक्त अन्य कोणाचाही भाडेकरार, साठेकरार, गहाण, कर्ज, बक्षीस, स्वरुपाचा कोणताही हक्क असल्यास त्यांनी तो योग्य त्या लेखी पुराव्यासह सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत ॲड. किशोर य. बैकर यांचेकडे दाखल करावा.

**ॲड. किशोर य. बैकर (वकील हायकोर्ट)**
३०२/१२, श्री साई दत्त एसआरए सीएचएस, बिल्डींग नं.१२, डॉ. ए.बी. रोड, प्रभादेवी, मुंबई-२५.

## बृहन्मुंबई महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन - वाहतूक
पूर्व उपनगर
क्र.ई.ई./टान्सपोर्ट/ईएस/७७२/एसडब्ल्यूएम दि.२७.०४.२०२६
**ई-निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे (बीएमसी) आयुक्त खालील ऑनलाईन निविदा आमंत्रित करत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव आणि ई-बोली क्र. | इसारा रक्कम ठेव (रु.) | निविदा फी (रु.) | बोली प्रारंभ दिनांक व वेळ | बोली अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | एस विभागात, टागोर नगर, बुराणी बालवाडी, विक्रोळी (पूर्व) येथील स्थिर कॉम्पॅक्टर चौकीचे नूतनीकरण, स्थलांतर आणि उभारणी. निविदा आयडी:- २०२६_एमसीजीएम_१२९८०४०१ | २६,०००/- | ७,९८६/- + @१८% जीएसटी | २८.०४.२०२६ दु.०४.०० वा. | ०५.०५.२०२६ दु.०४.०० वा. |

निविदेची प्रत महाराष्ट्र शासनाच्या ई-खरेदी प्रणालीवरून (Mahatenders) (https://mahatenders.gov.in/) डाउनलोड करता येईल; तसेच, ही निविदा प्रत बीएमसीच्या पोर्टल वेबसाईटवरूनही (http://portal.mcgm.gov.in) डाउनलोड करता येईल.

सही/-
पीआरओ/१८५/जाही./२०२६-२७ — कार्यकारी अभियंता (वाहतूक) ई/एस

खिडक्यांसाठी जाळ्यांचा आणि मच्छरदाण्यांचा वापर करा

## जाहिर सूचना

आमचे अशिल श्री.डॅरिल जॉन चेरुवथूर यांच्या वतीने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे; सदर नमूद केलेल्या सोसायटीतील फ्लॅटची धारक, तसेच शेअर्सची धारक व प्रवर्तक सदस्य म्हणून श्रीमती जी. पेरेरा होत्या. श्रीमती जी. पेरेरा यांनी श्री.केविन डॅरिल यांची नामनिर्देशित म्हणून नियुक्ती केली होती व त्यांच्या निधनानंतर सदर फ्लॅट व शेअर्स नामनिर्देशित श्री.केविन डॅरिल यांच्या नावे हस्तांतरित करण्यात आले. त्यानंतर श्री.केविन डॅरिल यांच्या निधनानंतर, सदर फ्लॅट / शेअर्स पुढील नामनिर्देशित श्री.डॅरिल जॉन यांच्या नावे हस्तांतरित करण्यात आले आहेत. सध्या श्री.डॅरिल जॉन हे सदर फ्लॅटच्या ताब्यात असून, त्यासंबंधित हस्तांतरण करण्याचा त्यांचा मानस आहे.

सर्व किंवा कोणताही पक्ष, व्यक्ती किंवा संस्था ज्यामध्ये कोणतीही व्यक्ती, कंपनी, बँक, नॉन-बँकिंग वित्तीय संस्था, ट्रस्ट, फर्म, भागीदारी फर्म, एलएलपी, व्यक्ती संघटना, व्यक्तींचा समूह, निगमित असो वा नसो, कर्ज देणारे, धनको किंवा कोणतेही प्राधिकरणास खाली वर्णन केलेल्या सदनिकेवर, त्यावर किंवा विरुद्ध विक्री, हस्तांतरण, नियुक्ती, देवाणघेवाण, गहाण, शुल्क, ट्रस्ट, मृत्युपत्र, सुखसोयी, तारण, भाडेपट्टा, वहिवाट, उप-वहिवाट परवाना, व्यवसाय, ताबा, धारणाधिकार, भेटवस्तू, वारसा, अधिभार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा, मंच, न्यायाधिकरण किंवा प्राधिकरणाचा हुकूम आदेश किंवा निवाडा, प्रलंबित खटले, कंत्राट/करार किंवा वचनबद्धता किंवा जी कोणत्याही दस्तऐवजावरील अधिकार, कब्जा, नियंत्रण किंवा भारावर आधारित असेल किंवा अन्यथा काहीही असो, याद्वारे कोणताही हक्क, शिर्षक, हितसंबंध, हिस्सा, मागणी किंवा दावा असल्यास त्यांनी याद्वारे हे प्रकाशित झाल्यापासून **१४** दिवसांच्या आत खालील स्वाक्षरीकर्त्याला सहाय्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात कळवणे आवश्यक आहे, जर असे झाले नाही आणि जर कोणताही वैध दावा प्राप्त झाला नाही, तर असा दावा माफ, समर्पण आणि कर्जमुक्त मानला जाईल;

**अनुसूची (फ्लॅटचे वर्णन)**

फ्लॅट क्र.डी/३५, हिमालया पर्वतीय को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.च्या इमारत डी च्या ३ऱ्या मजल्यावर स्थित असून, नेताजी पालकर मार्ग (एन.एस.एस. रोड), असल्फा, घाटकोपर (पश्चिम), मुंबई – ४०० ०८४, मोजमाप बिल्ट अप क्षेत्रफळ ५९ चौ.मी., गाव असल्फा, तालुका कुर्ला येथील सी.टी.एस.क्र. २९९ असलेल्या भूखंडावर बांधकामित, नोंदणी व उपनोंदणी जिल्हा मुंबई उपनगर जिल्हा, तसेच महानगरपालिका बृहन्मुंबईच्या ‘एल’ विभागाच्या हद्दीत, सदर इमारत तळ अधिक चार मजले अशी असून, लिफ्टशिवाय, इमारतीचे बांधकाम अंदाजे सन १९६८ मध्ये करण्यात आलेले आहे. तसेच, भाग प्रमाणपत्र क्र. १९२ मध्ये समाविष्ट असलेले भाग क्र.९५६ ते ९६० (दोन्ही समाविष्ट) हेही सदर फ्लॅटसह जोडलेले आहेत, हिमालया पर्वतीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. (नोंदणी क्र.बीओएम/एचएसजी/३११/१९६३) यांनी जारी केलेली आहेत.

**ठिकाण:** मुंबई **दिनांक:** २८.०४.२०२६

**नवीन जोशी लिगलकरिता**
सही/-
**नवीन जोशी,**
**वकिल उच्च न्यायालय, नोटरी**
एमएएच/११५६/१९८१
**पत्ता:** कार्यालय क्र.५, पारेख अपार्टमेंट, एन.एस.एस. रोड, असल्फा, घाटकोपर (पश्चिम), मुंबई-४०० ०८४. दूरध्वनी ७३०४८०८८५८

# अमेरिकेत नव्या फोनची क्रेझ

पान १ वरून

पॅरिश स्कूल येथे सुमारे ९५ टक्के कुटुंबांनी हे उपकरण स्वीकारले आहे. विद्यार्थ्यांना दूरध्वनी क्रमांक यादीचा वापर करण्याची सवय लावून पारंपरिक संवाद पद्धती पुन्हा रुजवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या उपक्रमामुळे मुलांमध्ये ऐकण्याची क्षमता, संवाद कौशल्य आणि आत्मविश्वास वाढत असल्याचे पालक व शिक्षकांचे मत आहे. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी चेट किटल्सन यांनी १९९० च्या दशकातील संवाद पद्धती पुन्हा आणण्याच्या उद्देशाने हे उपकरण तयार केल्याचे सांगितले.

## पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
मुख्य अभियंता (प्रकल्प) कार्यालय
**फेर निविदा जाहिरात**

विक्री कालावधी दिनांक :- दि. २८/०४/२०२६ ते ०४/०५/२०२६ दुपारी ३.०० वा. पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. २८/०४/२०२६ ते ०४/०५/२०२६ दुपारी ३.०० वा. पर्यंत
तांत्रिक निविदा (पाकीट 'अ') उघडणे प्रक्रिया दिनांकः- दि. ०५/०५/२०२६ दुपारी ३.०० वा.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | संकलन वेळ व झोन | वार्षिक मक्ता र.रु. | बयाणा रक्कम (१० % अनामत रक्कम + १०% निविदा रक्कम =२०%) | पार्किंग दर | कामाची मुदत | एक पाकिट/ दोन पाकीट पद्धत | निविदा संच रुपये | मनपा रजिस्ट्रेशन अट शिथिल आहे का? | कामाचा निविदा संच संपूर्ण हार्ड कॉपी/ सॉफ्ट कॉपी सोबत जोडली आहे का? | नवीन काम/ फेर टेंडर तपशील देणे | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ Chief Eng (Project) /2025/58 | पुणे पेठ नारायण ३४३, ३४७ वेलणकर शाळा भानुविलास सिनेमा येथील हरिभाऊ साने वाहनतळ मक्ता पध्दतीने व्यवस्थापन व संचलन करणे. | टेंडर गोषवारानुसार | ५६१०७८०.०० | ११२२१५६.०० | टेंडर गोषवारानुसार | कमाल ३ वर्षे | दोन पाकीट पद्धत | १३५९.०० | होय | होय | फेर टेंडर | श्री. प्रमोद महाले (उप अभियंता) ९६८९९३१२२१ श्रीमती विद्या वाबळे (कनिष्ठ अभियंता) ९६८९९३४३३६ |

अ) सदर कामांबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामाचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.
ब) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती मुख्य अभियंता (प्रकल्प), ३ रा मजला, मुख्य इमारत (जुने नगर सचिव कार्यालय), पुणे महानगरपालिका येथे मिळेल.
क) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि.) / ३२ दि. २२/०४/२०१६ नुसार अनामत रक्कम इ.सी.एस./ आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्विकारणेत येणार आहे.
ड) ठेकेदाराने अनामत रक्कम (इएमडी) रक्कम ऑनलाईन भरल्यास त्याची पावती 'अ' पाकिटात जोडावी.
इ) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.
ई) निविदा भरण्यापूर्वी ठेकेदार यांनी सर्व वाहनतळांची प्रत्यक्ष जागा पाहणी करूनच निविदा सादर करावी. सदरची सर्व वाहनतळे 'जेथे आहे जसे आहे' या तत्वावर संचलनास देणे आहेत. प्रत्येक वाहनतळाची पार्किंग क्षमता प्रत्यक्ष जागेवर ठेकेदार यांनी त्यांचे स्तरावर स्वतंत्रपणे खातरजमा करणे आवश्यक राहील. कार्यादेश दिल्यानंतर कोणत्याही स्वरूपाच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
फ) निविदा संचा सोबत जोडलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील. तसेच सोबतच्या टेंडर घोषवारामध्ये दर्शविलेल्या झोन नुसारच पार्किंग शुल्काची आकारणी करणे बंधनकारक राहील.

सही/-
(श्रीकांत गायकवाड)
कार्यकारी अभियंता (प्रकल्प)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/६२ दि.२७/४/२०२६

नवाकाळ

• मुंबई | मंगळवार २८ एप्रिल, २०२६ • पान -८

# पद्म पुरस्कार समितीतून मंत्री शेलार यांना वगळले

■ मुंबई

**पद्म पुरस्कार** २०२७ साठी राज्य सरकारने गठित केलेल्या शिफारस समितीतून राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांना वगळण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. या निर्णयामुळे समितीच्या रचनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून विविध तर्क-वितर्क रंगले आहेत.

पद्म पुरस्कारासाठी जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली ही सात सदस्यीय समिती राज्य सरकारने स्थापना केली आहे. या समितीमध्ये वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांचा समावेश आहे. मात्र, या समितीतून राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांना वगळल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पारंपरिकपणे कला, साहित्य, क्रीडा आणि चित्रपट क्षेत्राशी संबंधित शिफारशींमध्ये सांस्कृतिक विभागाचा महत्त्वाचा सहभाग असतो. त्यामुळे त्यांच्या



अनुपस्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

या समितीचे काम विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या नावांची छाननी करून अंतिम शिफारसी केंद्र सरकारकडे पाठवणे असते. यापूर्वीच्या प्रक्रियेत सांस्कृतिक मंत्री या समितीचा भाग असणे सामान्य मानले जात होते. विशेष म्हणजे, मुंबईतील कोणत्याही मंत्र्याचा या समितीत समावेश नसल्यानेही राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

# सिक्कीममध्ये नरेंद्र मोदीकडून हजारो कोटींच्या प्रकल्पांचे लोकार्पण

■ गंगटोक

**सिक्कीम** सुवर्णमहोत्सवानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसीय सिक्कीम दौऱ्यावर आहेत. या सोहळ्यात त्यांनी राज्यात ४ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक प्रकल्पांचे उद्‌घाटन, लोकार्पण आणि पायाभरणी केली. या दौऱ्यात मोदी कोट्यवधींच्या विकासकामांचे लोकार्पण करणार आहेत.

१६ मे २०२५ रोजी सिक्कीमला राज्य म्हणून ५० वर्षे पूर्ण झाली होती, तेव्हा पंतप्रधान ५० व्या स्थापना दिनाच्या समारंभात आभासी पद्धतीने (व्हर्चुअली) जोडले गेले होते. आताच्या दौऱ्याला सिक्कीमच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानले जात आहे. सिक्कीम दौऱ्याची सुरुवात करत राजधानी गंगटोक येथून झाली. या ठिकाणी मोदींचे उत्साहात स्वागत करण्यात आले. लिबिंग हेलिपॅड ते लोक भवन रोड शोदरम्यान मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरले होते. सुरक्षेच्या कारणास्तव काही भागांत वाहतुकीवर तात्पुरते निर्बंध लागू करण्यात आले. या दोन दिवसीय सिक्कीम दौऱ्यात मोदी शिक्षण, आरोग्य, कनेक्टिव्हिटी, पर्यटन, पर्यावरण आणि कृषी क्षेत्रातील ४ हजार कोटींच्या प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत.

# मराठी माणूस थांबता कामा नये संपात शिव ठाकरेची टॅक्सी सेवा

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ मुंबई

**महाराष्ट्रात** रिक्षा आणि टॅक्सी चालकांना १ मेपासून मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयानंतर राज्यात नवा वाद निर्माण झाला. मराठी न येणाऱ्या चालकांवर कारवाईचा इशारा दिल्यानंतर काही अमराठी आणि परप्रांतीय रिक्षा-टॅक्सी चालकांनी ४ मे रोजी संप पुकारला. यामध्ये राज्यभरातील सुमारे १५ लाख चालक आंदोलनात सहभागी होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर मराठमोळा अभिनेता शिव ठाकरे पुढे सरसावला. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून स्वतःची गाडी टॅक्सी म्हणून रस्त्यावर उतरवण्याची घोषणा केली. शिव ठाकरेची ही पोस्ट सध्या चांगलीच व्हायरल झाली.



शिव ठाकरेने इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये त्यांनी लिहिले की, राम राम महाराष्ट्र ४ मे रोजी टॅक्सी ड्रायव्हरचा संप आहे. तरीही आपल्या सेवेमध्ये एमएच२७ डी के ०९०९ (टाटा हॅरिअर) तुमच्या हक्काची टॅक्सी म्हणून कुठेही दिसल्यास हक्काने थांबवा. गाडीच्या मागे जय महाराष्ट्र आणि ड्रायव्हर सीटवर भगवा फेटा असलेला दादा आपल्या सेवेसाठी तत्पर असेल. काहीही होवो, मराठी माणूस थांबता कामा नये. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्यातील सर्व प्रवासी वाहन चालकांना मराठी भाषा शिकणे बंधनकारक असल्याचे जाहीर केले. त्यांनी महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल तर मराठीत संवाद साधता आला पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका घेतली.

# पश्चिम बंगालमध्ये मतदानासाठी सशस्त्र दलांची तैनाती कशाला?

**राऊतांचा मोदी-शहांना सवाल**

■ मुंबई

**मणिपूरमध्ये** वारंवार उफाळून येणारा हिंसाचार आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी निमलष्करी दल तैनात करण्याच्या मुद्यावरून शिवसेना उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यावर कडाडून टीका केली. मणिपूर जळत असताना तिथे जाण्याचे धाडस न दाखवणाऱ्या मोदी-शहांना पश्चिम बंगालमध्ये कसली भीती वाटते. मतदानाच्या वेळी लाखोंच्या संख्येने निमलष्करी जवानांची तैनाती कशासाठी, असा सवाल राऊत यांनी केला.

निवडणुका जिंकण्यासाठी आणि मतदारांवर दबाव टाकण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये मतदानादरम्यान



लाखोंच्या संख्येने सशस्त्र जवान तैनात केले जात आहेत, असा आरोप मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला होता. त्याचा संदर्भ देत राऊत यांनी मोदी आणि शहांवर टीका केली. जिथे जनतेच्या सुरक्षेसाठी खऱ्या अर्थाने पोलिसांची गरज असते तिथे ते नसतात. मात्र जिथे राजकारण करायचे आहे, तिथे सशस्त्र जवान तैनात केले जातात. तुम्ही मणिपूरमध्ये निमलष्करी दल पाठवा. तिथे त्याची खरी गरज आहे. ज्या उत्साहात मोदी आणि अमित शहा पश्चिम बंगालमध्ये रॅली काढत होते, तशीच हिंमत त्यांनी मणिपूरमध्ये जाऊन दाखवावी. तिथे रॅली काढा आणि लोकांना धीर द्या. पण तुम्ही तसे करणार नाही. कारण तुमची लोकशाही ही केवळ निवडणुका जिंकण्यापुरती मर्यादित आहे, असे राऊत म्हणाले.

# लडाखमध्ये नवीन पाच जिल्हा निर्मितीला मंजुरी

■ लेह

**लडाखचे** उपराज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी राज्यात पाच नवीन जिल्ह्यांच्या निर्मितीसाठीच्या अधिसूचनेला मंजुरी दिली आहे. नायब राज्यपाल व्ही. के.सक्सेना यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील एका पोस्टमध्ये ही घोषणा केली आहे. या पाच नवीन जिल्ह्यांच्या निर्मितीमुळे लडाखमधील जिल्ह्यांची एकूण संख्या आता सात होणार आहे. या निर्णयामुळे शासन नागरिकांच्या अधिक जवळ येईल आणि विकास, रोजगार व उद्योजकतेसाठी नवीन संधी निर्माण होतील, असे सक्सेना म्हणाले. नुब्रा, शाम, चांगथांग, झांस्कर, द्रास अशी पाच नवीन जिल्ह्यांची नावे आहेत.

# बिर्याणीवर कलिंगड खाल्ल्याने कुटुंबातील चौघांचा मृत्यू?

■ मुंबई

**मुंबईतील** पायधुनी परिसरात झालेल्या धक्कादायक घटनेत डोकाडिया कुटुंबातील चौघांचा अन्न विषबाधेमुळे मृत्यू झाल्याचा संशय आहे. अब्दुल्ला डोकाडिया (४०), आई नसरीन (३५), आयशा (१६), झैनब (१३) यांचा मृतांमध्ये समावेश आहे.

घाटी गल्ली येथील मुघल बिल्डिंगमध्ये वास्तव्यास असलेल्या डोकाडिया कुटुंबाने शनिवारी २५ एप्रिलला रात्री नातेवाईकांसोबत जेवण केले होते. जेवणात त्यांनी बिर्याणी खाल्ली आणि त्यानंतर कलिंगडचे सेवन केले. जेवणानंतर काही तासांतच कुटुंबातील सर्व सदस्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. सकाळपर्यंत त्यांना तीव्र मळमळ, उलट्या, चक्कर आणि पोटदुखीचा त्रास जाणवू लागला. सुरुवातीला त्यांनी स्थानिक डॉक्टरांकडून औषधे घेतली. मात्र प्रकृतीत कोणतीही सुधारणा झाली नाही. परिस्थिती गंभीर होत गेल्याने सर्वांना जे.जे. रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असतानाच झैनबचा मृत्यू झाला. त्यानंतर काही तासांतच



आयशा, आई नसरीन आणि वडील अब्दुल्ला डोकाडिया यांचाही मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच मुंबई पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन तपास सुरू केला. प्राथमिक चौकशीत कुटुंबातील एका सदस्याने डोकाडिया कुटुंबाने बिर्याणी आणि कलिंगड खाल्ल्याची माहिती दिली आहे. मात्र या प्रकरणात विषबाधा नेमकी कोणत्या कारणामुळे झाली याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

# शिंदेंसेनेची बच्चू कडू यांना विधान परिषदेची ऑफर?

■ मुंबई

**राज्यात** सध्या विधान परिषदेवर पाठवायच्या नऊ सदस्यांमध्ये कोणता पक्ष कोणाला संधी देतो याची जोरदार चर्चा आहे. अशातच शिंदेंच्या शिवसेनेने पक्ष विलीन करण्याच्या अटीवर प्रहार पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांना विधान परिषदेची ऑफर दिली आहे, अशी माहिती आहे. यावर बच्चू कडू हे आपल्या पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना व्हॉट्सॲप संदेश पाठवून पक्ष विलीन करण्याबाबत त्यांची मते जाणून घेत आहेत. बहुतांश पदाधिकाऱ्यांनी पक्ष शिवसेनेत विलीन करण्यास सहमती दर्शवणारे व्हॉट्सॲप संदेश कडू यांना पाठवले आहेत, असेही सांगितले जात आहे. दुसरीकडे शिंदेंच्या शिवसेनेकडून निलम गोऱ्हे यांना विधान परिषदेची उमेदवारी देण्यास पक्षातून तीव्र विरोध आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत एकनाथ शिंदे यांनी ज्योती वाघमारे यांना संधी देऊन सर्वांना थक्क केले होते. बच्चू कडूंना विधान परिषदेवर पाठवून शिंदे पुन्हा एकदा आश्चर्याचा धक्का देतील,अशी शक्यताही वर्तवली जात आहे.

# संजय कपूर यांच्या मालमत्तेचा वाद मध्यस्थीने सोडवा! कोर्टाचा सल्ला

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने दिवंगत उद्योगपती संजय कपूर यांच्या मालमत्तेवरून त्यांची दुसरी पत्नी प्रिया कपूर आणि आई राणी कपूर यांच्यात सुरू असलेला वाद मध्यस्थीतून सोडवण्याचे आवाहन केले. न्यायालयाने त्यांच्या ८० वर्षीय आई राणी कपूर यांना सांगितले की, या वयात दीर्घकाळ चालणाऱ्या कायदेशीर लढाईचा फारसा उपयोग होणार नाही. संजय कपूर यांची पहिली पत्नी अभिनेत्री करिश्मा कपूर हीदेखील या खटल्यातील एक पक्षकार आहे.



३०,००० कोटी रुपयांच्या मालमत्तेवरून संजय कपूरची आई रानी कपूर यांनी आपल्या सुनेविरुद्ध म्हणजेच प्रिया सचदेव कपूरविरुद्ध कायदेशीर लढा पुकारला आहे. रानी कपूर यांनी आरके फॅमिली ट्रस्टच्या निर्मितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. हा ट्रस्ट फसवणुकीने तयार करण्यात आला असून, त्याद्वारे त्यांना त्यांच्या मालमत्तेपासून आणि कुटुंबाच्या सोना ग्रुपमधील नियंत्रणापासून दूर ठेवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणात रानी कपूर यांनी कोर्टाकडे मागणी केली आहे की, या वादाचा निकाल लागेपर्यंत सर्व जंगम आणि स्थावर मालमत्ता सुरक्षित ठेवली जावी. सुनेला किंवा तिच्या सहकाऱ्यांना ट्रस्टच्या मालमत्तेत हस्तक्षेप करण्यास मनाई करावी.

# केईएमच्या नामांतरावरून उबाठा आक्रमक

■ मुंबई

**मुंबईतील** ऐतिहासिक किंग एडवर्ड मेमोरियल रुग्णालय अर्थात 'केईएम' रुग्णालयाच्या नामांतराच्या प्रस्तावावरून राज्यात राजकीय वाद पेटला. राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी रुग्णालयाचे नाव बदलून 'कौशल्य श्रेष्ठ एकलव्य स्मारक रुग्णालय' करण्याचा प्रस्ताव मांडला असून, त्याला प्राथमिक स्तरावर पालिकेच्या आरोग्य समितीने मंजुरी दिल्याची माहिती आहे. या नामांतराला डॉक्टरांच्या 'मार्ड' संघटनेसह उबाठाने विरोध करत आंदोलन केले.

केईएम रुग्णालयाचे नाव बदलण्याच्या विरोधात उबाठाने निदर्शने केली. आंदोलकांनी यावेळी मंगलप्रभात लोढा यांच्या विरोधात घोषणा दिल्या. यावेळी उबाठा आमदार अजय चौधरी, विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. पेडणेकर म्हणाल्या की, १९२५ मध्ये किंग

**लोढा निर्णयावर ठाम**



एडवर्ड यांनी रुग्णालय उभारणीसाठी ७ लाख रुपयांचे योगदान दिले होते. त्यावेळी लोढा यांचे पूर्वज कुठे होते? वेगवेगळ्या इमारती बांधून आज त्यांच्याकडे पैसे आले आहेत.




# फॅशन डिझायनर तरुण यांच्या बांधकाम प्रकल्पाला नोटीस

■ पणजी

**उत्तर** गोव्यातील बारदेश तालुक्यातील साल्वादोर-द-मुंडो येथे सुरू असलेल्या प्रसिद्ध फॅशन डिझायनर तरुण तहिलियानी यांच्या बांधकाम प्रकल्पाला स्थानिक पंचायतीने कायदेशीर नोटीस बजावली आहे. पोंबुर्पा-ओळावली पंचायतीने तहिलियानी यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावून तत्काळ बांधकाम थांबवण्याचे आदेश दिले आहेत.

हा प्रकल्प बेकायदेशीरपणे सुरू असल्याचा आणि तो

**पोंबुर्पा-ओळावली पंचायतीची कारवाई**

पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात येत असल्याचा आरोप करत स्थानिकांनी विरोध केला होता. या प्रकल्पाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यानंतर तहिलियानी यांच्या वकिलांनी पुढील सुनावणीपर्यंत कोणतेही नवीन बांधकाम करणार नसल्याचे न्यायालयाला सांगितले आहे. पोंबुर्पा-ओळावली पंचायतीच्या विशेष बैठकीत असे निरीक्षणे नोंदवले की, ताहिलियानी यांनी न्यायालयाला दिलेल्या हमीपत्राचे आणि कायदेशीर आदेशांचे उल्लंघन केले आहे. तसेच सुधारित आराखड्याशिवाय आणि नवीन परवानगी न घेताच प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यात आले आहे.

# भोंदू अशोक खरातचा कोठडीतील मुक्काम वाढला! १७ गुन्ह्यांची नोंद

■ नाशिक

**नाशिकमध्ये** महिला लैंगिक शोषण आणि आर्थिक फसवणुकीच्या अनेक गुन्ह्यांत अडकलेल्या भोंदू अशोक खरातला सातव्या गुन्ह्यात २९ एप्रिलपर्यंत ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. तो मागील सुमारे ४० दिवसांपासून कोठडीत आहे. त्याच्यावर नाशिकमध्ये आतापर्यंत एकूण १७ गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे.

सत्र न्यायालयाने सहाव्या गुन्ह्यात त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतरही तपास यंत्रणांनी त्याचा ताबा पुन्हा विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) घेतला. सरकारी वकिलांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, न्यायालयीन कोठडीत असताना कारागृहात इतर कैद्यांकडून खरातच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे त्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन हा निर्णय घेतला आहे. खरातला १८ मार्च रोजी अटक करण्यात आली होती.

# कोल्हापुरात आ. गायकवाडविरोधी पुरोगामी संघटनांचे आंदोलन पेटले

**पोलीस-आंदोलकांमध्ये झटापट**

■ कोल्हापूर

**बुलडाण्याचे** शिंदे सेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी कॉ. गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावरून प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोनवरून शिवीगाळ केली. त्यानंतर पुरोगामी संघटना आक्रमक झाल्या आहेत. कोल्हापूर शहरातील बिंदू चौक परिसरात आज पुरोगामी संघटनांच्या वतीने आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी गायकवाड यांच्याविरोधात दखलपात्र गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. मात्र पोलिसांकडून कारवाई न झाल्याने आंदोलकांनी आज राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुतळा दहन करण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलीस आणि आंदोलकांमध्ये झटापट झाली.

प्रशांत आंबी म्हणाले की, आम्ही निषेध म्हणून गृहमंत्र्यांचा पुतळा जाळणार होतो. पण पोलिसांना त्या पुतळ्याची एवढी काळजी आहे की, त्याचे संरक्षण करताना जिवंत माणसाचा जीव गेला तरी चालेल. या झटापटीत एखाद्याचा जीव गेला तर जबाबदार कोण? छत्रपती शिवाजी महाराज, कॉम्रेड गोविंद पानसरे या महाराष्ट्रातील महिलांपेक्षा देवाभाऊंच्या फक्त पुतळ्याची सुरक्षितता त्यांना जास्त महत्त्वाची आहे. आमच्यासारखी जिवंत माणसे महत्त्वाची नाहीत. मी आज

# भारत-न्यूझीलंड ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी



■ नवी दिल्ली

**सुमारे** दशकभर चाललेल्या चर्चेच्या फेऱ्यांनंतर अखेर आज भारत आणि न्यूझीलंडदरम्यान ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर उभय देशांच्या वाणिज्य मंत्र्यांनी स्वाक्षरी केली. न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन यांनी या कराराचा उल्लेख अत्यंत दुर्मीळ (वन्स इन अ जनरेशन) करार असा केला. या करारामुळे वस्तू आणि सेवा क्षेत्रातील व्यवसायाचे अनेक मार्ग आता खुले झाले आहेत, असेही लक्सन म्हणाले.

भारताचे वाणिज्य मंत्री पियुष गोयल आणि न्यूझीलंडचे वाणिज्य मंत्री टोड मॅकक्ले यांनी आपापल्या देशांच्या वतीने आज या करारावर स्वाक्षरी केली. या करारामुळे उभय देशांदरम्यान व्यवसाय सुलभ झाला आहे. व्यवसायाआड येणारे अटी आणि नियम कमी करून व्यवसाय सुलभता वाढवण्यावर भारत नेहमीच आग्रही राहिला आहे. अशा प्रकारचे व्यावसायिक वातावरण आम्हाला तयार करायचे आहे की, जे परस्पर विश्वासावर आधारित असेल. गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारे असेल. असे वातावरण की ज्यामध्ये दोन्ही देशांना समसमान व्यवसायसंधी उपलब्ध होतील आणि दोन्ही देशांचा उत्कर्ष साधला जाईल, असे करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर पीयूष गोयल म्हणाले. याप्रसंगी गोयल यांनी न्यूझीलंडच्या उद्योजकांना भारतात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले. भारत हा संपूर्ण जगामध्ये विस्तार करण्यासाठी एक महत्त्वाचा मार्ग ठरू शकेल. मग तो मध्य आशिया असो, आफ्रिका, लॅटिन अमेरिका असो किंवा युरोप वा अमेरिका असो. भारत या साऱ्यांना जोडणारा महत्त्वाचा व्यापारी दुवा ठरू शकतो, असे गोयल म्हणाले.

# पोपट हा संरक्षित 'वन्यजीव'च नुकसानभरपाईचे कोर्टाचे आदेश

**नागपूर खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निकाल**

**मुंबई उच्च न्यायालयाने एका अत्यंत महत्त्वपूर्ण निकालात पोपट हा वन्यजीव (संरक्षण) कायद्यांतर्गत 'वन्य प्राणी' असल्याचे स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे पोपटांनी पिकांचे नुकसान केल्यास शेतकऱ्यांना सरकारी नुकसानभरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

■ मुंबई

**वर्धा** जिल्ह्यातील हिंगी गावचे शेतकरी महादेव डेकाटे यांच्या डाळिंबाच्या बागेचे जवळच्या वन्यजीव अभयारण्यातील पोपटांनी मोठे नुकसान केले होते. मे २०१६ मध्ये घडलेली ही घटना आहे. यामध्ये कोकाटे यांच्या डाळिंब बागेचे मोठे नुकसान झाल्यामुळे त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके आणि न्यायमूर्ती निवेदिता मेहता यांच्या नागपूर खंडपीठाने हा ऐतिहासिक निर्णय दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार पोपट हे संरक्षित वन्यजीव आहेत आणि त्यांच्यामुळे होणाऱ्या नुकसानीची



भरपाई मिळणे शेतकऱ्यांचा हक्क आहे. न्यायालयाने असेही स्पष्ट केले की, हत्ती, डुक्कर यासारखे केवळ मोठे वन्यजीव यांच्यामुळेच नुकसान होते असे नाही, तर पोपटांसारख्या संरक्षित पक्ष्यांमुळेही नुकसान होऊ शकते. अशा संरक्षित वन्यजीवांमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई न मिळाल्यास शेतकरी वन्यजीवांना हानी पोहोचवू शकतात, ज्यामुळे संवर्धनाचे प्रयत्न अयशस्वी होतील, अशी चिंता न्यायालयाने व्यक्त करत संबंधित शेतकऱ्याला नुकसानभरपाई देण्याचे आदेश राज्य सरकारला दिले. या निकालामुळे पोपट आता अधिकृतपणे वन्यजीवांच्या व्याख्येत येत असल्याने त्यांच्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकरी भरपाईसाठी पात्र ठरले आहेत.